सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२२५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ४ ऑक्टोबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## कोट्यवधी भाविकांच्या आस्थेचा विषय, स्वतंत्र एसआयटी तपास करणार; सुप्रीम कोर्टाचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४नवी दिल्ली**

तिरुमला तिरुपती वेंकटेश्वर बालाजी मंदिरात लाडू प्रसादाच्या वादावरून अलीकडील काळात राजकारण चांगलेच तापल्याचे पाहायला मिळाले. यासंदर्भात भाजपा नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल केली. या याचिकेवरील सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने स्वतंत्र विशेष तपास पथकाकडून तिरुपती बालाजी मंदिरातील लाडू भेसळीचा तपास केला जाईल, असे महत्त्वाचे निर्देश दिले.



तिरुपती मंदिरातील लाडू भेसळ प्रकरणातील राज्य सरकारकडून केला जात असलेला एसआयटी तपास तात्पुरता स्थगित करण्यात आला. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाच्या विचाराधीन असल्यामुळे तपास पुढे ढकरण्यात आला आहे, असे आंध्र प्रदेशचे डीजीपी द्वारका तिरुमला राव यांनी सांगितले. या प्रकरणाच्या तपासासाठी नऊ सदस्यीय विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले होते. परंतु, आता या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने नवे निर्देश देत स्वतंत्र विशेष तपास पथक तिरुपती मंदिरातील लाडू भेसळ प्रकरणाचा तपास करेल, असे स्पष्ट केले आहे.

न्यायालयाला राजकीय लढाईचा आखाडा बनू देऊ इच्छित नाही. नवीन विशेष तपास पथकात दोन उइख अधिकारी, आंध्र प्रदेश सरकारचे दोन प्रतिनिधी आणि FSSAI च्या एका सदस्याचा समावेश असेल. सीबीआय संचालक एसआयटीच्या तपासावर लक्ष ठेवतील, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. एसआयटी क्षमतेबद्दल शंका नाही. तपासाची देखरेख केंद्रीय पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्याकडे सोपवावी, अशी आमची मागणी आहे. या प्रकरणात काही तथ्य असेल तर ते तसेच सोडून देणे चुकीचे आहे. देशभरात भक्त आहेत. अन्नसुरक्षाही महत्त्वाची आहे. एसआयटी सदस्यांकडून तपास करण्यात येत असल्याबद्दल कोणताही आक्षेप नाही, असा युक्तिवाद सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी यावेळी केला.

दरम्यान, याचिकाकर्त्यांच्या वतीने कपिल सिब्बल यांनी न्यायालयाला सांगितले की, या संदर्भात पुन्हा निवेदन देण्यात आले आहे. न्यायालयाने या प्रकरणाच्या तपासाची जबाबदारी एसआयटीऐवजी स्वतंत्र तपास यंत्रणेकडे सोपवावी, असे सिब्बल म्हणाले. यावर, कोट्यवधी भाविकांच्या श्रद्धेचा विषय आहे. या प्रकरणाचे राजकारण होऊ नये, अशी आमची इच्छा आहे, असे सांगत न्यायालयाने स्वतंत्र विशेष तपास पथक स्थापन करून तपास करण्याचे निर्देश दिले.

## मुंबईच्या पाणी तुटवड्याला आदित्य ठाकरे जबाबदार; आशिष शेलारांचा गंभीर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ मुंबई**

मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांनी आदित्य ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. गेल्या दहा वर्षात मुंबई महापालिकेने एकही नवीन धरण बांधलं नाही, नवीन पाण्याची व्यवस्था केली नाही, उलट गारगाई धरण प्रकल्प रद्द केला आणि समुद्राचे पाणी गोडे करण्याचा प्रस्ताव जबरदस्तीने मुंबईकरांच्या माथी मारला. तोही पूर्ण होऊ शकला नाही, त्यामुळे आज मुंबईची ही अवस्था झाली आहे. त्यामुळे याला संपूर्ण जबाबदार आदित्य ठाकरे आणि त्यांचा उबाठा सेना हा पक्ष आहे असा आरोप आशिष शेलार यांनी केला आहे.



मुंबईत ठिकठिकाणी कमी दाबाने पाणीपुरवठा होतो आहे, अनेक ठिकाणी पाणीच येत नाही, त्यामुळे पाणी पुरवठ्याच्या अनेक तक्रारी सातत्याने लोकप्रतिनिधी म्हणून सगळ्यांकडे केल्या जात आहेत. आज याबाबत माध्यमांशी संवाद असताना शेलार म्हणाले की, ९० च्या दशकामध्ये मुंबईच्या पाणीपुरवठ्या बाबत अभ्यास करून कृती आराखडा सादर करण्यासाठी डॉक्टर माधवराव चितळे यांची समिती मुंबई महापालिकेने गठीत केली होती. या समितीने गारगाई आणि पिंजाळ व मध्यवैतरणा या तीन धरणांचा कृती आराखडा मुंबई महापालिकेला तयार करून दिला.आदित्य ठाकरे आणि त्यांच्या पक्षाने हा केलेला खेळखंडोबा याचे दुष्परिणाम आज मुंबईकरांना भोगावे लागत आहेत. पिण्याच्या पाण्यावरून मुंबईकरांच्या डोळ्यात अश्रू आले आहेत. आज हे जे मुंबईत दुर्दैवी चित्र उभे राहिले आहे त्याला संपूर्ण जबाबदार आदित्य ठाकरे आहेत. मुंबई ३४% पाणी गळती आहे असे महापालिका सांगते आहे. त्यासाठी कोट्यावधीची कंत्राटे दिली, पण त्याचे पुढे झाले काय? हे कळायला मार्ग नाही असे गंभीर आरोप आमदार शेलार यांनी केला.


## ३ ऑक्टोबर 'मराठी अभिजात भाषा दिवस' म्हणून साजरा होणार; मंत्रिमंडळाचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

मराठी भाषेसह पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा महत्त्वाचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने गुरुवारी घेतला. त्यामध्ये बंगाली, पाली, प्राकृत, आसामी या भाषांचा समावेश आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, अशी जगभरातील मराठी माणसांकडून अनेक वर्षांपासून होत असलेली मागणी केंद्र सरकारने अखेर मान्य केली. या निर्णयाचे राज्यभरात स्वागत होत आहे. आज राज्य मंत्रिमंडळ बैठकीतही या निर्णयाचा आनंद व्यक्त केला. तसेच याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी अपडेट दिली आहे. आता यापुढे ३ ऑक्टोंबर हा दिवस 'मराठी अभिजात भाषा दिवस' म्हणून साजरा होणार आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडिया प्लॅफॉर्म एक्सवर दिली आहे.

### मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला!

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदेजी, मी, तसेच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि संपूर्ण मंत्रिमंडळाने अत्यानंद व्यक्त केला. जो विषय इतके वर्ष प्रलंबित होता, त्याला मान्यता दिल्याबद्दल मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, मा. केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शाह आणि केंद्रीय मंत्री




गजेंद्रसिंग शेखावत यांचे आभार व्यक्त करणारा ठराव करण्यात आला, असं या पोस्टमध्ये म्हटले आहेत.३ ऑक्टोबर हा दिवस दरवर्षी मराठी अभिजात भाषा दिवस म्हणून साजरे करण्याचा निर्णय सुद्धा आम्ही घेतला, असंही यात म्हटले आहे.


### केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठीसह पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत घेतलेला निर्णय ऐतिहासिक स्वरूपाचा आहे, असे केंद्रीय माहिती व प्रसारण खात्याचे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले. सर्व भारतीय भाषांचा वारसा जपण्यासाठी केंद्र सरकारने हा निर्णय घेतला आहे, असे ते म्हणाले. भारताचा प्राचीन सांस्कृतिक वारसा जपण्याचे महत्त्वाचे काम भाषा करत आहेत, असेही केंद्र सरकारने म्हटले आहे. अभिजात भाषा अशी नवी वर्गवारी निर्माण करण्याचा निर्णय केंद्र सरकारने १२ ऑक्टोबर २००४ साली घेतला होता.

## अखेर 'अहिल्यानगर'वर शिक्कामोर्तब अहमदनगरच्या नामांतराला राज्याची मंजुरी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ अहिल्यानगर**

अहमदनगरचं नाव 'अहिल्यानगर' झालं असल्याची माहिती समोर आलीयं. अहमदनगर जिल्ह्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे नाव देण्याच्या मागणीवर आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज शिक्कामोर्तब झाले. नामंतराच्या या प्रस्तावाला केंद्र सरकारने मंजूरी दिल्यानंतर आता अहमदनगर जिल्हा अहिल्यानगर म्हणून ओळखला जाणार आहे.




अहमदनगर जिल्ह्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याची मागणी अनेक दिवसांपासून होती. नागरिकांच्या या मागणीनंतर महायुती सरकारने नागरिकांच्या या मागणीचा सकारात्मक विचार केला. नगर जिल्ह्याचं नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नगर करण्याचा निर्णय घेण्यात आला. अहिल्यानगर नामांतराच्या बाबतीतील सर्व प्रक्रीया ही केंद्र सरकारच्या अखत्यारीत होत असल्याने प्रत्येक विभागाची ना हरकत आवश्यक असते. केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने नामांतराच्या बाबतीत हरकत नसल्याचे पत्र जारी केले आहे. अहिल्यानगर नावास मान्यता दिली आहे. या नावाचे कोणतेही रेल्वे स्टेशन देशात नसल्याचेही त्यांनी आपल्या पत्रात नमुद केले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती जामखेडच्या चौंडीत साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना भाजपचे आमदार राम शिंदे यांनी अहमदनगरचे नाव अहिल्यानगर करा, अशी मागणी केली होती. त्यानंतर क्षणाचाही विलंब न करता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी होकार दर्शवला होता. आता अहमदनगरचे नाव अहिल्यानगर होणारच, असं देवेंद्र फडणवीसांनी ठणकावून सागितलं होतं.अहमदनगरचे नाव अहिल्यानगर नामांतर करावे, अशी मागणी भाजपचे आमदार गोपीचंद पडळकरांनी शासन दरबारी केली होती. त्यानंतर अनेक सामाजिक संघटनांकडूनही शासन दरबारी पाठपुरावा करण्यात येत होता. एवढंच नाहीतर अहमदनगरचे नाव अहिल्यानगर व्हावे यासाठी यात्राही काढण्यात आली होती. अहमदनगरच्या नामांतरावरुन विविध समाजांकडूनही मागण्यात करण्यात आल्याचं पाहायला मिळालं होतं.

## आदिवासी आमदारांचा आक्रमक पवित्रा; मंत्रालयातील संरक्षण जाळीवर उतरून आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

धनगरांना अनुसूचित जमातीतून आरक्षण देण्याच्या मागणीविरोधात विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्या नेतृत्वाखाली सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील आदिवासी आमदार आक्रमक झाले आहेत. शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत चर्चा निष्फळ झाल्याचे सांगत आदिवासी समाजातील आमदारांनी मंत्रालयातील संरक्षण जाळीवर उतरून आंदोलन सुरु केले.

धनगर समाजाला आदिवासी समाजात समाविष्ट करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी समिती गठीत केली आहे. यासंदर्भात कायद्याचा मसुदाही तयार केला जात आहे. धनगरांचा अनुसूचित जमातीत समावेश करण्यास आदिवासींचा विरोध आहे. यासंदर्भात आदिवासी समाजात प्रचंड रोष आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि नरहरी झिरवाळ यांच्यात चर्चा झाली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आम्ही तुमच्या विषयाबाबत सकारात्मक आहोत, असे आश्वासन नरहरी झिरवाळ यांना दिले. मात्र कुठलाही निर्णय न झाल्याने आदिवासी आमदारांनी आक्रमक पवित्रा उचलला आहे.



नरहरी झिरवाळ, आमदार हिरामन खोसकर यांच्यासह यांचे सहकाऱ्यांनी थेट मंत्रालयातील संरक्षण जाळीवर उतरून आंदोलन सुरु केले. मात्र, पोलिसांनी त्यांना संरक्षण जाळीवरून बाहेर काढले. तरीही नरहरी झिरवाळ यांच्यासह आदिवासी आमदार आक्रमक झाले आणि त्यांनी मंत्रालयात ठिय्या आंदोलन सुरु केले. तसेच, गेल्या १५ दिवसांपासून आदिवासी विद्यार्थ्यांकडून पेसाभरती अंतर्गत भरतीच्या आंदोलन करत आहेत. मात्र, यावर कुठलाही तोडगा निघत नसल्याने आज आदिवासी आमदारांनी असे आक्रमक पाऊल उचलले.

दरम्यान, राज्यात पेसा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आदिवासी विकासमंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेतली होती. त्यावेळी शिंदे यांनी १५ सप्टेंबरपर्यंत पेसा कायद्याअंतर्गत नोकरभरती सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु, अद्यापही या आश्वासनांची पूर्तता झाली नाही, असा आरोप नरहरी झिरवाळ यांनी केला. त्यामुळे ऐन निवडणुकीच्या तोंडावर मराठा आणि ओबीसी आंदोलनापाठोपाठ सत्ताधारी पक्षाच्या आदिवासी आमदारांचे आंदोलन महायुती सरकारची डोकेदुखी वाढवणार असल्याचे चित्र आहे.

## हर्षवर्धन पाटलांचा भाजपाला रामराम; शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करण्याची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४इंदापूर**

गेली ६ दशकापासून पवार कुटुंबाचे आणि आमचे संबंध खूप चांगले आहेत. परंतु आज निर्णय करताना आम्ही जी भूमिका घेतो, ती जनतेची भूमिका असते. त्यामुळे आम्ही आज पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. भाजपाच्या राज्यातील प्रमुख नेत्यांशीही चर्चा झाली त्यांना माझ्या निर्णयाची कल्पना दिली. शरद पवारांच्या चर्चेनंतर मी त्यांच्या पक्षात जाण्याचा निर्णय घेतोय असं सांगत हर्षवर्धन




पाटील यांनी भाजपाला रामराम ठोकला आहे.

हर्षवर्धन पाटील यांनी इंदापूरात समर्थकांचा जाहीर मेळावा घेतला. त्यानंतरच्या पत्रकार परिषदेत ते म्हणाले की, गेली २ महिने मी तालुक्यातील गावागावांचा दौरा करतोय. नेमका निर्णय काय घ्यायचा यासाठी मी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली. दीड दोन तास राजकीय भूमिकेबद्दल चर्चा झाली. त्यांनी माझ्यासमोर काही प्रस्ताव ठेवले, मी माझी भूमिका मांडली. शेवटी निवडणूक लढवायची असेल तर ही जागा महायुतीतील विद्यमान सदस्य असतील ते लढवणार असं त्यांनी सांगितला. दुसरा पर्याय दिला तो व्यक्तिश: मला आणि माझ्या कार्यकर्त्यांना स्वीकारणे योग्य वाटला नाही. राजकारणात आणि समाजकारणात व्यक्तिगत प्रश्नापेक्षा आपल्यामागील जनतेचं हित महत्त्वाचं असते. मी गुरुवारी सिल्व्हर ओकला शरद पवारांना भेटायला गेलो. तिथे दीड तास सविस्तर चर्चा झाली. त्या बैठकीत खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. फोनवरून जयंत पाटीलही होते. तुम्ही आमच्या पक्षात यावं असा आग्रह पवारांनी धरला अशी माहिती त्यांनी दिली.

## मला संपवू नका, मीच राहिलो नाही, तर तुम्ही..., अशोक चव्हाणांचे विधान चर्चेत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

माजी मुख्यमंत्री आणि लोकसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेसमधून भाजपामध्ये आलेल्या खासदार अशोक चव्हाण यांचे एक भाषण चर्चेत आले आहे. विरोधकांकडून होत असलेल्या टीकेवर उद्विग्न प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. एकवेळ टीव्ही बंद पडेल, पण हे थांबत नाहीत. २४ तास सुरू असतात, असे अशोक चव्हाण म्हणाले.



अशोक चव्हाण म्हणाले, विकासात्मक कामं करण्यासंदर्भात ज्या अपेक्षा आहेत, त्या अपेक्षा करण्याकरिता अशोक चव्हाण सदैव तुमच्याबरोबर आहे, हे जाहीरपणे मी सांगतो. काही मतभेद नाहीत. पण माझ्या उणीवा लांबलचक यादी करून... हे अशोक चव्हाणमुळे... हे अशोक चव्हाणमुळे; माझे नाव घेतल्याशिवाय काही गमतच नाही.

### अशोक चव्हाण विरोधकांना म्हणाले, मलाही जिवंत ठेवा

माझं म्हणणं मीच उद्या नाही राहिलो, राजकीय क्षेत्रात कोणावर बोलणार तुम्ही? बोलणार कोणावर? माझं म्हणणं आहे की, मलाही जिवंत ठेवा. मी जिवंत राहिलो, तर तुम्ही पण जिवंत राहाल. मीच संपलो, तर तुम्ही कसे राहणार? तुम्हाला बोलायला काही राहणार नाही, असे उत्तर अशोक चव्हाणांनी दिले.

मला संपवू नका. जी मंडळी टीका करतात, त्यांना म्हणतोय. २४ तास चालू असतात. एवढं तर वाईट केलं नाही ना कोणाचं? केलंय का? माझं म्हणणं एवढंच आहे की, इथंपर्यंत यायला ४० वर्षे गेली. शेलगावने मला साथ दिलेली आहे, मी नाकारणार नाही, विसरणार नाही, असे अशोक चव्हाण म्हणाले.

## संपादकीय ......

# अभ्यासक्रमांतील बदल तर्कसंगत

गेल्या काही वर्षांपासून पालकांमध्ये केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाचे आकर्षण वाढताना दिसत आहे. त्यामुळे देशभर या शाळांची आणि विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. देशातील एकूण विद्यार्थी संख्या लक्षात घेता, हे प्रमाण फार नाही. या शाळांचे अभ्यासक्रम राष्ट्रीय स्तरावरील असल्याने देशपातळीवरील विविध स्पर्धा परीक्षाही याच अभ्यासक्रमांवर आधारलेल्या असतात. त्यामुळेच आता केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाला संलग्न असलेल्या शाळांच्या अभ्यासक्रमांच्या धर्तीवर राज्य मंडळाच्या शाळांचा अभ्यासक्रम तयार करण्याची भूमिका पुढे आली आहे.

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये चमकदार कामगिरी करावी यासाठी केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाला संलग्न असलेल्या शाळांच्या अभ्यासक्रमांच्या धर्तीवर राज्य मंडळाच्या शाळांचा अभ्यासक्रम तयार करून अंमलबजावणी करण्याची भूमिका पुढे आली आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन अभ्यासक्रमांचा विचार केला जात असतो. शिक्षण हा समवर्ती सूचीतील विषय आहे. त्यामुळे राज्य आणि केंद्र सरकार शिक्षणविषयक धोरण घेऊ शकते. गेली काही वर्षे सर्वच क्षेत्रांतल्या केंद्रीकरणाच्या विरोधात आवाज उठविला जात आहे. अशा वेळी आपण स्वत:हून केंद्रीकरणाच्या दिशेने जात असल्याचा हा पुरावा म्हणायला हवा. शाळांचे अभ्यासक्रम राष्ट्रीय स्तरावरील असल्याने देशपातळीवरील विविध स्पर्धा परीक्षाही याच अभ्यासक्रमांवर आधारलेल्या असतात. त्यामुळे या परीक्षांमध्ये संबंधित विद्यार्थी यशस्वी होतात हे खरे आहे. त्यामुळे भविष्याच्या दृष्टीने ज्यांना तो मार्ग निवडायचा आहे, त्या विद्यार्थ्यांचे पालक आरंभापासूनच केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाच्या शाळांची निवड करतात. त्या दृष्टीने राज्य सरकारचा निर्णय निश्चितच तर्कसंगत आहे; पण केवळ स्पर्धा परीक्षा हे कोणत्याही शिक्षणाचे उद्दिष्ट असू शकत नाही. त्यापलीकडे अनेक उद्देशांसाठी विद्यार्थी शिक्षण घेत असतात. त्या विद्यार्थ्यांचे काय, असा प्रश्न उरतोच. शेवटी शिक्षण म्हणजे केवळ स्पर्धा परीक्षा नाही. अभ्यासक्रम हा शेवटी उत्तम नागरिक, समाज व राष्ट्रनिर्मितीसाठी आहे. त्या दृष्टीने विचार करण्याची गरज अलीकडच्या घटना पाहता अधोरेखित होऊ लागली आहे. त्यामुळे समग्र विकासाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठीचा विचार केंद्रस्थानी येण्याची गरज आहे.

राज्य सरकारने घेतलेली भूमिका स्पर्धा परीक्षा आणि शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या वर्गांसाठी केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाच्या धर्तीवरील अभ्यासक्रम राबवण्याचे सूतोवाच करण्यात आले आहे. हा अभ्यासक्रम राबवण्यामागे जी कारणे आहेत, त्यात विविध स्पर्धा परीक्षांमध्ये आपले विद्यार्थी मागे पडताहेत, हे एक कारण सांगितले जात आहे. अलीकडील काळात देशात विशिष्ट प्रकारच्या अभ्यासक्रमांसाठी केंद्रीय स्तरावरून प्रवेश परीक्षा घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे. त्यात अभियांत्रिकी, वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठी राष्ट्रीय प्रवेश परीक्षा घेण्यात येताहेत. त्यामुळे राज्य आणि केंद्रीय अभ्यासक्रमांत समानता असावी, असा विचार पुढ येत आहे. राष्ट्रीय स्तरावरून घेण्यात येणार्या परीक्षांचे मूल्यमापन लक्षात घेता अधिकाधिक प्रश्न हे केंद्रीय स्तरावरील अभ्यासक्रमातील घटकांशी निगडित असतात. राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना त्या परीक्षांना सामोरे जाताना काहीसे कठीण जाते. त्यातून राज्याचा अभ्यासक्रम हा केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळासारखा असला पाहिजे, अशी भूमिका घेणारा एक समूह आहे. त्यातून सर्व अभ्यासक्रम समान असायला हवा, अशी मागणीदेखील पुढे येऊ लागली आहे. केवळ केंद्रीय प्रवेश परीक्षांसाठी अशा प्रकारची भूमिका समोर येत असल्याने राज्य मंडळाचा अभ्यासक्रम हा टाकाऊ आहे का, असाही प्रश्न उपस्थित केला जाऊ लागला. राज्यातील शाळा केंद्रीय मंडळाच्या अभ्यासक्रमाशी नाते सांगणार्या असायला हरकत नाही; पण त्यातील खरी मेख ही अभ्यासक्रमाची नसून, शिक्षणाचा दर्जा उंचावण्याचा, शिक्षणातील अव्यवस्था दूर करण्याचा, शाळांमधील सुविधा वाढविण्याचा मुद्दा महत्त्वाचा आहे. शिक्षण सेवेतील संस्थांची स्वायत्तता टिकविण्याचा आहे.

# माते जगदंबे..!



प्रखर तेजस्विनी, महिषासुरमर्दिनी माते, काल घटस्थापनेच्या दिवशी तू घराघरांत विराजमान झाली आहेस. हे माते, जगदंबे, प्रथम तुला नमन. अष्टभुजा मिरवत शस्त्रास्त्रांसहित सज्ज असे तुझे रूप मनाला मोहून घेते. जागरण, गोंधळ या विविध माध्यमांमधून तुझ्या नामाचा जयघोष केला जातो. हे माते, देवांवर जेव्हा संकट आले, तेव्हा तुलाच साक्षात महिषासुरमर्दिनीचे रूप घेऊन देवांनाच संरक्षण देण्याचे कार्य करावे लागले आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये तुळजापूर, कोल्हापूर, माहूर, अमरावती, बीड या आणि अन्य ठिकाणी तुझी प्रमुख ठाणी असून, भक्तगणांची तिथे वर्षभर रांग असते. एकाच वेळी तुझे विराट आणि कोमल हृदयी असणारे रूप पाहून भक्त सद्गदित होत असतात.

ज्या राक्षसांचा नि:पात करणे देवांनाही शक्य झाले नाही, त्या मायावी असुरांचा आपल्या आदिशक्ती रूपाने तू नाश केलास आणि या ब्रह्मांडाला विलय होण्यापासून वाचवलेले आहेत. तुझ्या कर्तृत्वामुळेच प्रत्येक स्त्रीमध्ये आदिमायेचे रूप आम्ही पाहू शकतो. तुझ्या रूपाला मोहून आणि तुझा आशीर्वाद असावा यासाठी भल्या पहाटे पाच वाजता अनवाणी पायांनी असंख्य भक्तगण तुझ्या दर्शनासाठी चालत असतात. नवरात्र काळामध्ये तुझे अस्तित्व सर्वत्र जाणवत असल्यामुळे हा काळ चैतन्याचा, धार्मिकतेचा आणि तुझ्या आशीर्वादाचा काळ आहे, याची दिव्य प्रचिती तुझ्या भक्तांना येत असते. हे विंध्यवासिनी माते, काळ बदलला तसे राक्षसांचे रूपही बदलत गेले आहे. कोणत्या वयाची व्यक्ती नराधम म्हणून राक्षसाच्या रूपात समोर येईल, याची शाश्वती कोणालाच राहिलेली नाही. वय वर्षे ७५ असो की ५५ असो, लहान बालिकांसोबत लगट करणारे पुरुष हे राक्षसच म्हणावे लागतील. चिमुरड्या बालिकांपासून ते वयोवृद्ध स्त्रियांपर्यंत सर्वच आमच्या माता-भगिनी घाबरून गेल्या आहेत. संध्याकाळी किंवा रात्री, एवढेच नव्हे, तर चक्क दिवसाही मुली बाहेर फिरण्यास घाबरत आहेत. ज्या शाळांमध्ये आपल्या बालवाडीच्या किंवा प्राथमिक शाळेच्या वयाच्या मुली आहेत, ते सर्व पालकही भयभीत झालेले आहेत. बदलापूर येथे तीन वर्षांच्या मुलींबरोबर घाणेरडा प्रकार करणार्या नराधमाला नुकतेच नरकात पोहोचविण्यात आले. अशी तत्काळ शिक्षा झाली की, नागरिकांना आनंद होतो; परंतु त्यामुळे अशा असुर प्रवृत्तीच्या लोकांवर काही परिणाम होईल असे वाटत नाही. महाराष्ट्रात कधी, कुठे काही प्रकार घडतो, तर तिकडे कोलकाता येथे एका डॉक्टर तरुणीवर अत्याचार केले जातात. या अशा घटनांमुळे संपूर्ण देश हादरून जात असतो. हे माते, महिषासुरमर्दिनीचे तुझे रूप घेऊन तू पुन्हा सत्वर कार्यरत हो. प्रत्येक महिलेला या राक्षसी प्रवृत्तीच्या नराधम पुरुषांपासून वाचण्याची शक्ती दे. कधी, कुठे काही असा प्रसंग आला तर त्याप्रसंगी हे माते, तू आमच्या माता-भगिनींच्या पाठीशी उभी राहा. नव्हे-नव्हे, तू प्रत्यक्ष त्यांच्या शरीरामध्ये प्रवेश करून अत्याचार करणार्यांना देहदंडाची कठोर शिक्षा कर हीच विनंती. कायदा, सुव्यवस्था, पोलिस यंत्रणा, नीतिमत्ता या सर्वांना अजिबात न घाबरणारे काही वासनांध समाजात जागोजागी दिसून येत आहेत. हे आदिमाते, तू त्यांचा नि:पात कर आणि तुझ्या भक्तांचे जगणे सुखकर कर, एवढीच या वर्षीच्या नवरात्रीनिमित्ताने आमची आग्रहाची मागणी आहे.

# मळणी यंत्र वापरताना होणारे अपघात टाळण्यासाठी काय खबरदारी घ्याल? वाचा सविस्तर

**विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष**

**विदर्भ प्रजासत्ताक**

कृषी यांत्रिकीकरणामध्ये मळणी यंत्र हे एक प्रमुख यंत्र आहे. पिक काढणी नंतर मळणीसाठी याचा वापर केला जातो. मळणी यंत्र खरेदी करत असाल तर त्याची रचना माहित असणे आवश्यक आहे.

तसेच त्याचा वापर कसा करावा आणि बऱ्याच वेळा मळणी यंत्र वापरताना अपघात होतात त्यात मळणी यंत्र सुरु असताना त्यात हात जाणे तसेच यात कधी कधी जीव गमवावा लागतो.

यासाठी मळणी यंत्र वापरताना मळणी यंत्र मालक व शेतकऱ्यांनी काय काळजी घ्यावी या विषयी आपण महिति पाहणार आहोत.

**मळणी यंत्र वापरताना काय काळजी घ्यावी**

१) सुरक्षित मळणी करण्यासाठी खडख मार्क असलेलेच मळणी यंत्र वापरावे.

२) पिकाची मळणी करण्यापूर्वी पूर्णपणे वाळलेले असावे.

३) पिक मळणीची जागा राहत्या घरापासून दूर व समतोल असावी.

४) रात्री मळणी करतांना योग्य प्रमाणात उजेड असेल तरच मळणी करावी.




५) मळणी यंत्राची दिशा अशा प्रकारे ठेवावी कि बाहेर पडणारा भुसा व वाऱ्याची दिशा एकच राहिल.

६) सर्व नटबोल्ट व्यवस्थित घट्ट बसवावे.

७) यंत्रामध्ये पिकाची टाकणी एकसारखी व एकप्रमाणात असावी.

८) यंत्राच्या जाळ्यांची वरचेवर पाहणी करावी व स्वच्छ करावयात.

९) ८-१० तासानंतर मळणी यंत्रास थोडी विश्रांती द्यावी.

१०) मळणी सुरु करण्यापूर्वी यंत्र मोकळे चालवून यंत्राचा कोणता भाग घासत नसल्याची खात्री करुन घ्यावी, असल्यास निर्मात्याने दिलेल्या शिफारशीनुसार बदल करावे.

११) मळणी करतांना सैल कपडे घालू नये.

१२) मळणी यंत्रात पिक टाकतांना चालकाने हात सुरक्षित अंतरावर ठेवावे.

१३) चालकाने मद्यपान केलेले नसावे किंवा त्या ठिकाणी धुम्रपान करु नये, तसेच जवळ पाणी व वाळु ठेवावी कारण कधी कधी आग लागण्याची शक्यता असते.

१४) सामन्यत: इखड ने प्रमाणित केलेले सुरक्षित फिडींग वापरावे.

१५) बेअरिंग किंवा वळणाऱ्या पार्टला वंगण द्यावे तसेच बेल्ट तणाव चेक करावा.

# बाजार समितीच्या ई निविदा तक्रारी विरोधात विभागीय आयुक्तांकडून चौकशी समिती गठीत

## समितीचे दोन सदस्य प्रकरणाची चौकशी करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती-** अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत ई निविदा नियमबाह्य राबविल्याचा आरोप करीत याबाबत विभागीय आयुक्तांकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्तांनी दोन सदस्यीय चौकशी समितीचे गठण केलेले आहे. अमरावती एपीएमसी प्रशासनाने ४४ लाख रुपयांचे विद्युत कामांमध्ये प्राप्त निधीचे ई-निविदा प्रक्रिया नराबवता, एका कामाचे बनावट प्राकलन तयार करून नियमबाह्य केलेली कामे, सन २००९ पासून एकाच व्यक्तीस साफसफाई कंत्राट व मुदत संपल्या नंतर निविदा न मागवता त्याच नावे काढलेली खर्च बिले, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची पुनर्नियुक्ती किवा मुदतवाढ न देण्याबाबत शासनाचे परीपत्रक विरोधात नियमबाह्य नियुक्तया आदी बाबत शेखर



औगड, प्रकाश साबळे, उमेश,महिगे, राहुल तायडे सह शेतकरीसंघर्ष समिती पदाधिकारी व शेतकरी यांच्या बाजार समिती विरोधातील विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार दिली. या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधकांना दिलेल्या आदेशनुसार सचिन पतींगे, उपनिबंधक व सुशील ठोके लेखापरीक्षक अमरावती या दोन अधिकाऱ्याची जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी नुकतीच चौकशी समितीचे स्थापन केली आहे.




# कृतीतून ठेवा हृदय निरोगी

**विदर्भ प्रजासत्ताक**

चांगले कर्म केल्याने हृदयाच्या चांगल्या कामांमध्ये गुंतून राहिल्याने हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आरोग्य चांगले राखता येते. जर हृदयाचे आरोग्य चांगले राखायचे असेल तर चांगली कृती करावी, इतरांनाही मदत करावी. आरोग्यावरही सकारात्मक परिणाम होतो.

संकटात सापडलेल्या गरजू व्यक्तींना मदत करणे, हसतमुख राहणे, एखाद्याचे कौतुक करणे, गरजूंसाठी आर्थिक मदत करणे आणि समाजासाठी काम करणे किंवा स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून काम करणे, झाडे लावणे, मित्र आणि कुटुंबातील सदस्यांना मदत करणे यामुळे तुम्हाला मानसिक समाधान मिळते.

पर्यायाने तुमचे हृदय निरोगी राहण्यास मदत होते. हृदयावर कार्याचा प्रभाव कसा होतो ? कामात गुंतून राहिल्याने हृदयाला भावनिक आणि शारीरिक दोन्ही प्रकारे पोषण मिळते. जेव्हा एखादी व्यक्ती स्वत:चे सामाजिक मूल्य जपत काम करते; तेव्हा त्यांना आनंद आणि समाधानाची उच्चपातळी अनुभवता येते, ज्यामुळे शरीरातील वाढलेल्या तणावाचे हार्मोन्स कमी होतात. आणि रक्तदाबही कमी होतो.

यामुळे हृदय निरोगी राहते आणि हृदयविकाराचा झटका टाळता येतो. जर एखादी व्यक्ती कोणतेही अर्थपूर्ण काम करत असेल, तर तो/ती तणावमुक्त राहू शकतो आणि चिंता आणि नैराश्य कमी करू शकतो, जे हृदयासाठी फायदेशीर असते.

संशोधनानुसार, ज्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या नोकरीत आनंद आणि समाधान मिळते, त्यांना तुलनेने कमी तणावाचा अनुभव



असतो आणि याचा थेट परिणाम हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित आरोग्यावर होतो. तणावामुळे अनेकदा आहाराच्या चुकीच्या सवयी आणि शारीरिक निष्क्रियता यांसारख्या सवयी लागतात.

जेव्हा व्यक्ती त्यांच्या एखाद्या कार्यात स्वत:ला गुंतवून ठेवते, तेव्हा ती ताणतणावांच्या विरुद्ध आपली लवचीकता वाढविते, ज्यामुळे रक्तदाब आणि कोलेस्ट्रोलवर नियंत्रण राखता येते. तणाव किंवा चिंताग्रस्त होऊ नये म्हणून एखाद्याने शांत राहणे, मनातील चिंता, विचार यांना दूर करणे गरजेचे असते.

जे लोक अशा पूर्ण करणाऱ्या क्रियाकलापांमध्ये गुंतलेले असतात, त्यांच्यात ऊर्जा आणि आशावाद जास्त असतो, ज्यामुळे धूम्रपान किंवा अती मद्यपानाच्या घटना कमी होतात आणि हृदय निरोगी राहते. त्यासाठी आनंद मिळेल अशा कामात स्वत:ला गुंतवून ठेवणे हे हृदयासाठी चांगले आहे.

# मुऱ्हादेवी येथे उपासनेच्या महापर्वाला सुरुवातआदिशक्तीचा जागराने तालुका भक्तीमय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी तालुक्याचे आराध्य दैवत असलेल्या मु-हादेवी येथील आईजगदंबादेवीव झिंग्राजी महाराज संस्थान येथे गुरुवार ३ ऑक्टोबरपासून नवरात्रोत्सवाला सुरुवात झाली आहे. शारदीय नवरात्र म्हणजे उपासनेचे महापर्वच आहे. अश्विन शुद्ध प्रतिपदेला घटस्थापना होऊन पुढील नऊ दिवस हा उत्सव भक्तांसाठी मोठी पर्वणीच असते.मु-हादेवी हे मोठे शक्तीस्थान असून आई जगदंबेच्या या उत्सवात येथे भाविकांची मोठी गर्दी व यात्रा उत्सव होत असल्याने सर्वकाही शांततेत पार पडावे. यासाठी मंदिराचे विश्वस्त मंडळ व ग्रामपंचायत गावकऱ्यांच्या वतीने जय्यत

तयारी करण्यात आली आहे. शिवाय नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवात मु-हादेवी गावाला यात्रेचे स्वरूपयेत असल्याने शांतताव सुरक्षेसाठी यात्रेकरू व गावकऱ्यांनी सहकार्य करण्याचे

**नवरात्र विशेष**

आवाहन पोलीस प्रशासन व सरपंच

संध्या पखान, उपसरपंच शेख इब्राहिम, ग्रामसचिव अनंत बहादुरे, संस्थानचे अध्यक्ष साहेबराव पखान, उपाध्यक्ष चंद्रशेखर घोगरे, सचिव रमेश पांडे, सदस्य दीपक घोगरे,



गोवर्धन, बोंदरे, चंद्रशेखर बोंदरे, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य पोलीस पाटील यांनी केले आहे. नवरात्रोत्सवात मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात विद्युत रोषणाई करण्यात आली असून अख्खे गाव प्रकाशमय झाले आहे. जगदंबेचा जागर करत देवीचा गोंधळ घालत हा नवरात्रोत्सव मोठ्या अध्यात्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी नऊही दिवस न्हाऊन निघणार आहे. भक्तांची मोठी गर्दीच्या नियोजनाकरीता चिंचोली रहिमापुर पोलीस स्टेशनच्यावतीने उत्सव काळात येथे मोठा पोलिस बंदोबस्त लावण्यात आला असून या परिसरात पोलीस चौकी सुद्धा उभारण्यात आली आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ४ ऑक्टोबर २०२४ शहर/ग्रामिण


# शिंदे गटाचे आमदार संजय राठोड यांच्या कारचा भीषण अपघात

## एअरबॅग्ज खुल्या झाल्यामुळे संजय राठोड बचावले

### चालक गंभीर, पिकअपला दिली धडक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४यवतमाळ** यवतमाळ येथे पालकमंत्री संजय राठोड यांच्या कारचा भीषण अपघात झाला आहे. कोपरा या गावात मध्यरात्री दोन वाजता हा अपघात झाला आहे. यात चालक गंभीर जखमी झाला आहे. मंत्री राठोड यांच्या कारने मागून पिकअपला धडक दिली आहे. अपघातानंतर तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले.

पोलीस सूत्रांच्या मिळालेल्या माहितीनुसार,हा अपघात यवतमाळ येथील कोपरा या गावाजवळ झाला. अपघातानंतर गाडीमधील एअरबॅग्ज खुल्या झाल्यामुळे संजय राठोड बचावले. राठोड यांच्या कारने पाठिमागून समोरच्या पिकअपला जोरदार धडक दिली. मंत्री राठोड ३ ऑक्टोंबर रोजी यवतमाळ दौऱ्यावर होते. रात्री उशीरा प्रवास करत असताना त्यांच्या कारचा अपघात झाला.

गाडीने समोर असलेल्या पिकअपला जोरदार धडक दिल्यामुळे कारच्या पुढच्या भागाचा चक्काचूर झाला आहे. अपघातानंतर लगेच गाडीतील एअरबॅग्ज उघडल्या. यामुळे मंत्री राठोड बचावले. पण,



ड्राइव्हर जखमी झाला आहे. समोर असलेल्या पिकअपचा ड्राइव्हरही जखमी झाला आहे.

# समृद्धीवरील टोलचे कंपनीचे कंत्राट रद्द?

## नियमांचे उल्लंघन; एमएसआरडीसीकडून नोटीस जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४नागपूर–** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) वांद्रे वरळी सागरी सेतू आणि समृद्धी महामार्गावरील टोल वसुलीचे कंत्राट रद्द करत असल्याची नोटीस रोडवेज सोल्युशन इंडिया प्रायव्हेट लिमिटेडला बजावली आहे. कंत्राटदाराकडून कंत्राटातील विविध अटींचे उल्लंघन होत असल्याने, तसेच उत्पन्न आणि टोलवरून गेलेली वाहने यामध्ये फरक येत असल्याने एमएसआरडीसीने ही कारवाई केली आहे. तसेच नव्याने कंत्राटदार नियुक्तीची प्रक्रिया एमएसआरडीसीने सुरू केली आहे.रोडवेज सोल्युशन इंडिया आणि फास्टगो या कंपन्यांना ऑगस्ट २०२२ मध्ये वांद्रे वर्सोवा सी–लिंकवरून टोल वसुलीचे कंत्राट एमएसआरडीसीने दिले होते. तर समृद्धी महामार्गावर टोल वसुलीसाठी डिसेंबर २०२२ मध्ये कंत्राटदाराची नियुक्ती केली होती. मात्र, कंत्राटदाराकडून वारंवार नियमांचे उल्लंघन होत असल्याचे समोर आले होते.



### कंत्राट रद्द करण्याची कारणे

प वाहनचालकांशी गैरवर्तन करणे.

प प्रवासी वाहनांची संख्या आणि उत्पन्न यात तफावत आढळून येणे.

प रस्त्याची देखभाल योग्यरितीने न करणे.

प कामागारांचे विमा न भरणे, तसेच त्यांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर न करणे.

प काही टोल लेन सातत्याने बंद असणे.

कंत्राट रद्द करण्याची नोटीस बजावण्यात आल्यानंतर कंत्राटदाराने त्यावर अपील दाखल केले होते. तसेच कंत्राटातील विवाद सोडविणे सुरु केले आहे. यावर पुढे काय होते हे पाहून पुढील निर्णय घेतला जाईल.

**– अनिलकुमार गायकवाड,** व्यवस्थापकीय संचालक, एमएसआरडीसी

समृद्धी महामार्गावरील टोल नाक्यावरील कामगारांच्या वेतनाचे प्रश्न असल्याने कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले होते. दरम्यान, एमएसआरडीसीने वांद्रे वर्सोवा सी–लिंकवरील तक्रारींबाबत कंपनीला तीन ते चार वेळा कारणे दाखवा नोटीस बजावली होती. तसेच समृद्धी महामार्गावरील तक्रारींच्या पार्श्वभूमीवर २० हून अधिक वेळा पत्रे लिहिली होती. मात्र, त्यानंतरही रोडवेजच्या कामात सुधारणा होत नसल्याने अखेर कंत्राट रद्द करण्याची नोटीस कंत्राटदाराला बजावण्यात आली आहे, असे अधिकाऱ्यांनी नमूद केले.

# राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचा विविध घटकांशी संवाद

## नागरी सेवा परीक्षांसाठी प्रशिक्षण, खेळाडूंना तिरंदाजीचे उत्कृष्ट प्रशिक्षण व साहित्य उपलब्ध करून द्यावे







**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ अमरावती –** राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज जिल्हा दौऱ्यात शासकीय विश्रामगृह येथे विविध राजकीय पक्षांचे प्रमुख नेते, लोकप्रतिनिधी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांशी जिल्ह्यातील विविध विकास विषयक प्रश्नांवर चर्चा केली. तसेच उद्योग, संस्कृती, पर्यटन, साहित्य तसेच विविध समाज घटकांशी संवाद साधून त्यांच्या विकासविषयक अपेक्षा, समस्या व संकल्पना जाणून घेतल्या.यावेळी माजी आमदार प्रवीण पोटे –पाटील, माजी राज्यमंत्री वसुधाताई देशमुख, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे सचिव पद्मश्री प्रभाकर वैद्य, मेळघाटचे पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे, साहित्यिक वसंत आबाजी डाहाके विभागीय आयुक्त डॉ. निधि पाण्डेय, गाडगेबाबा





अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मिलिंद बाराहाते, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, वनविभागाच्या जयोती बॅनर्जी आदी उपस्थित होते.राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांच्या समोर मान्यवर व्यक्तींनी विदर्भातील शेतकरी आत्महत्या, सिंचन अनुशेष, विदर्भातील प्रशासकीय अधिकारी यांचा अनुशेष, क्रीडाविषयक पायाभूत सुविधा. 'उद्योगांसाठी पोषक वातावरण 'नागरी सेवा परीक्षांसाठी दर्जेदार प्रशिक्षण यासारखे विषय मांडले. राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सर्व गटांचे म्हणणे ऐकून घेत सर्व मागण्या व विकास संकल्पनांबाबत लक्ष घालण्या बाबत आश्वस्त केले.मेळघाटात पुरेशा प्रमाणात पाऊस पडतो. परंतु पावसाचे पाणी थांबविण्यासाठी जल संधारणाची कामे करण्यात यावी. बांध आणि इतर कामे करण्यासाठी स्वतंत्र प्रकल्प निर्माण करण्यात यावा. टेक्सटाईल पार्कमधील उद्योजकांनी जिल्हा आणि पोलीस प्रशासन संपूर्ण सहकार्य करीत आहे. त्यासोबतच कामगारांच्या संघटनांही सहकार्य करणे आवश्यक आहे. यामुळे उद्योजकांना उद्योग उभारणीसाठी पोषक वातावरण तयार होईल. याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा. पोलिस प्रशासनानेही याबाबत तक्रार आल्यास योग्य ती कार्यवाही तात्काळ करावी. याबाबत राजकीय पक्षांशीही चर्चा करण्यात यावी. यामुळे उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल.खेळाडूंनी खेळामध्ये जास्त लक्ष द्यावे लागत असल्यामुळे अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे शक्य होत नसल्याने अल्प प्रक्रियेत शासकीय नोकरी मिळण्याची प्रक्रिया करण्यात यावी. अशी अपेक्षा खेळाडूंनी व्यक्त केली. याबाबत राज्यपालांना शासनाच्या ध्येय धोरणानुसार याबाबत कार्यवाही होईल असे आश्वस्त केले.अमरावती येथे तिरंदाजी खेळामध्ये उत्तम पायाभूत सुविधा आहेत. येथे या क्रिडा प्रकारबाबत आंतरराष्ट्रीय सुविधा निर्माण होवू शकतील. यासाठी उत्तम प्रशिक्षक तसेच क्रीडा साहित्य मिळावे. तसेच उत्तम प्रशासकीय अधिकारी निर्माण व्हावे यासाठी नागरी प्रशिक्षण संस्था निर्माण करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रभाकर वैद्य यांच्या यावेळी राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.जिल्हाधिका–यांनी जिल्ह्यातील विविध योजनांचे सादरीकरण केले. या बैठकीला प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी बैठकीत जिल्हयाचा ऐतिहासिक–सांस्कृतिक, भौगोलिक स्थिती व उदयोग व जिल्हा विकास आराखडयानुसार विकासाचे नियोजनाचे सादरीकरण केले.

# चिखलदऱ्यात वैराट जंगल सफारी सुरू

## पर्यटकांना मिळणार जंगल सफारी चा आनंद

### पर्यटकांना सफारीचा लाभ घेता येणार

चिखलदरा येथे ३४ जिप्सी गाड्या आहेत. वैराट जंगल सफारी बुधवारपासून आपण सुरू केलेली आहे. त्यामुळे पर्यटकांना या जंगल सफारीचालाभघेतायेईल, अशी प्रतिक्रियावनपरिषद अधिकारी राहुल धाईत वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी बोलताना सांगितले.–

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४चिखलदरा –** चिखलदरा हे विदर्भाचे नंदनवन असून थंड हवेचे ठिकाण आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी असते. विशेष करून पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक चिखलदऱ्यात येतात. पावसाळ्यात जंगल सफारी बंद करण्यात येते. आता पुन्हा बुधवारला वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या कार्यालया पासून वैराट पर्यंत जंगल सफारीसुरू करण्यात आली. यावेळी पर्यटकांना पुष्पगुच्छ देऊन जंगल सफारीची सुरुवात करण्यात आली.अमरावती, नागपूर, यवतमाळ , अकोला, बुलढाणा अशा संपूर्ण विदर्भातून तसेच महाराष्ट्रातील व ✻ मध्य प्रदेशातील सुद्धा पर्यटक मोठ्या प्रमाणात चिखलात येतात. मात्र पावसाळ्यात जंगल सफारी बंद असते, कारण पावसाळ्यात रस्त्यांची अवस्था दयनीय असते. जंगलातले रस्ते पावसामुळेखराब होतात. त्यामुळे पावसाळ्यात जंगल जंगल सफारी बंद असल्यामुळे पर्यटकांना जंगलसफारीचा आनंद घेता येत नाही. आजपासून चिखलदरा जंगल सफारी सुरू झाल्यामुळे




विदर्भातील पर्यटकांमध्ये आनंदाची वातावरण आहे. तसेच स्थानिक जिप्सी चालक–मालकयांच्यामध्ये सुद्धा आनंदाचे वातावरण आहे. कारण जंगल सफारी साठी मोठ्या प्रमाणात पर्यटकांची पसंती असते. आता चिखलदरात मोठ्या प्रमाणात पर्यटक जंगल सफारी साठी येणार आहेत व त्या माध्यमातून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. पर्यटन व्यवसायालासुद्धा चालना मिळणार आहे. त्या माध्यमातून स्थानिकांच्या हातात पैसा खेळणार आहे. आज या ठिकाणी वनपरिक्षेत्रा अधिकारी यांच्या कार्यालया पासून वैराट पर्यंत जंगल सफारीसुरू करण्यात आली. यावेळी पर्यटकांनापुष्पगुच्छ देऊन जंगल सफारीची सुरुवात करण्यात आली.या सोबतच स्थानिक गाईड युनियन ला सुद्धा रोजगार उपलब्ध होणार आहे. त्यामुळे त्यांच्यामध्ये सुद्धा आनंदाचे वातावरण आहे. यासोबतच विदर्भातील पर्यटकांचीया जंगल सफारीला प्रथम पसंती असते. या जंगल सफारी मध्ये प्रामुख्याने वाघ, अस्वल, रानगवे, हरीण, सांबर, बिबट अशा अनेक वन्य प्राण्यांचे दर्शन पर्यटकांना होते, हे विशेष.

# वन्यजीव पर्यावरण संवर्धन संस्था अमरावती व मेळघाट व्याघ्र प्रकल्प तर्फे इको वॉलेंटियर कार्यशाळेचे आयोजन

## ग्रीन वॉरियर पुरस्कारांचे वितरण




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती –** वन्यजीव सप्ताह निमित्ताने वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था अमरावती (वेक्स) तथा मेळघाट व्याघ्र प्रकल्प संचनालय, अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी इको व्हालेंटीयर कार्यशाळा या एकदिवसीय पर्यावरण जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन मेळघाट कार्यालयाच्या कुलढाप सभागृहात करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी शहरातील एकूण ०७ महाविद्यालयाचे एकूण ५५ विद्यार्थी सहभागी झाले होते.कार्यशाळे करिता उद्घाटक म्हणून मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक श्री. आदर्श रेड्डी होते तर प्रमुख उपस्थिती मध्ये मेळघाटचे विभागीय वनाधिकारी श्री. मनोज खैरनार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वेक्सचे सचिव डॉ. जयंत वडतकर तसेच मंचावर कोषाध्यक्ष प्रा. डॉ गजानन वाघ, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत वऱ्हेकर व सहसचिव प्रा.डॉ. मंजुषा वाठ यांची उपस्थिती होती. कार्यशाळेचे समन्वयक किरण मोरे, सौरभ जवंजाळ, मनीष ढाकुलकर यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी अरण्यम संस्थेचे. सर्वेश मराठे, युथ फॉर नेचर कंझर्व्हेशनचे पंकज बांडाबुचे, शंतनु पाटील यांची विशेष उपस्थिती होती. कार्यशाळेचे उद्घाटन दीप प्रज्वलन तथा म. गांधी व लाल बहादूर शास्त्री यांचे प्रतिमा पूजन करून करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वेक्सचे सचिव तथा मानद वन्यजीव रक्षक डॉ. जयंत वडतकर यांनी केले. मातीचे गणपती बसवा निसर्गाशी बांधिलकी दाखवा हा पर्यावरण पूरक उपक्रम वेक्स हि संस्था अमरावती शहरात गेली १९ वर्षे राबवीत आहे. तसेच वन्यजीव अभ्यास, संशोधन, व जनजागृती अशा अनेक उपक्रमात संस्थेसोबत जुळलेल्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून कार्य करीत असतात. या विद्यार्थ्यांना पर्यावरण व वन्यजीव या विषयाची जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने संस्था दरवर्षी या कार्यशाळेचे निशुल्क आयोजन करीत असते. पर्यावरणासाठी स्वयंसेवक बनण्यासाठी तरुणांना प्रोत्साहित करणे हा कार्यशाळेचा हेतू असल्याचे डॉ जयंत वडतकर यांनी आपल्या प्रास्ताविकातून सांगितले.कार्यशाळेच्या उद्घाटक मेळघाटचे वनसंरक्षक आदर्श रेड्डी यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात भारतातील वन्यजीवन आणि कायदे व तसेच व्याघ्रप्रकल्पाचे यश व आवाहने व सध्याच्या विविध समस्या यावर भाष्य करून विद्यार्थ्यांना या क्षेत्रात कार्य करण्यासाठी पुढे येण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन केले. एखाद्या कार्यासाठी संपूर्ण आयुष्य देणारी मंडळी फार मोजकी आहेत मातीचे गणपती बसवा निसर्गाशी बांधिलकी दाखवा हा पर्यावरण पूरक उपक्रम वेक्स हि संस्था अमरावती शहरात गेली १९ वर्षे राबवीत आहे.अशा ग्रीन वॉरियरला हा वेक्स तर्फे पुरस्कार देऊन सन्मानित करीत आहात याकरिता त्यांनी संस्थेचे अभिनंदन केले.वेक्स संस्थेने गेल्या २४ वर्षात केलेल्या कामाचा आढावा घेऊन संस्थेची कामगिरी अतिशय भरीव असल्याचे तसेच निसर्ग, पर्यावरण व वन्यजीव याप्रती जिव्हाळा व जाणीव असलेली माणसे एकत्र येऊन काम करणारी संस्था म्हणून आज वेक्स ची वेगळी ओळख आहे असे डॉ जयंत वडतकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले.उद्घाटन कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. सर्वप्रथम २०२४ चा ग्रीन वॉरियर पुरस्कार वन्यजीव व पर्यावरण क्षेत्रात कार्य करणारे, मानव वन्यजीव संघर्ष या विषयाचे तज्ज्ञ मार्गदर्शक अशी ओळख असलेले डॉ. स्वप्निल सोनोने यांना प्रदान करण्यात आला. सोबतच या वर्षीचा उत्कृष्ठ स्वयंसेवक पुरस्कार विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था येथील वनस्पतीशास्त्र विभागातील संशोधन विद्यार्थीनी कु. मयुरी कथलकर व श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथील विद्यार्थी कपिल दैवत यांना प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन कु. मयुरी कथलकर हिने केल तर आभार प्रदर्शन संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत वऱ्हेकर यांनी केले.संस्थेची जोडल्या जाणाऱ्या या स्वयंसेवकांना निसर्ग संवर्धन व त्यासंबंधी इतर अनेक प्रकारची माहिती देण्याच्या उद्देशाने तसेच त्यांचे इको भान राखण्याच्या उद्देशाने आयोजित कार्यशाळेतील पहिल्या सत्रातील व्याख्यानात डॉ. जयंत वडतकर व्याघ्र संवर्धन व सध्यस्थिती तसेच मेळघाटातील संवर्धनाचा इतिहास या विषयावर आपले अभ्यासपूर्ण असे सादरीकरण केले.

पुढील सत्रात डॉ. स्वप्निल सोनोने यांनी मानव वन्यजीव संघर्ष व त्यामध्ये आपली भुमिका या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रात प्रा. डॉ. गजानन वाघ यांनी पक्षी जैवविविधता , त्यांचे महत्त्व, विविध समस्या, व त्यांचे संवर्धनाची आवश्यकता तसेच पक्षी स्थलांतर याविषयी सखोल माहिती आपल्या सादरीकरणाव्दारे दिली.या कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील विभागीय वनाधिकारी श्री.मनोज खैरनार, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप भड, प्रतिक चौधरी, सुमित अंबुलकर, अंकुश गावंडे, अमेय ठाकरे, आनंद मोहोड, श्री. प्रशांत निकम, यांचे विशेष सहकार्य लाभले.

# ठाणेदार अशोक जाधव ॲण्ड टीमची दबंग कारवाई

## बासपाणी गावातून २.१२ लाखांची गावठी दारू जप्त

### गावकऱ्यांच्या दारूबंदीचे निवेदन येताच धाड , फरार आरोपींविरोधात गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४धारणी:** मेळघाटाच्या इतिहासात प्रथमच आदिवासी गावातील नागरिकांनी गांधी जयंती निमित्त दारूबंदीचा ठराव करून धारणी पोलिसांना कारवाईचे निवेदन दिले. धारणीचे ठाणेदार अशोक जाधव यांनी निवेदन प्राप्त होताच तातडीने बासपाणी गावातील गावठी अड्ड्यावर धाड घालून तब्बल २ लाख १२ हजार रुपए किमतीची गावठी दारू व दारू बनविण्याचे साहित्य जप्त केले. पोलिसांच्या या कारवाईमुळे गावातील महिला, पुरूष नागरिकांनी पोलिसांवर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.धारणीपासून नजीक असलेल्या बासपाणी गावात मोठया प्रमाणात गावठी दारूची निर्मिती व विक्री करण्यात येत होती. यामुळे गावातील लोकांची, युवकांची दारू पिण्याचे प्रमाण वाढले होते. अति दारू सेवनामुळे अनेकांना आपला जीव गमवाला लागला, कित्येक कुटूंब उघडयावर पडले. त्यामुळे गावातील नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांना दोन प महिन्यापूर्वी निवेदन देऊन गावात ग दारूबंदीची मागणी केली होती. तसेच घ बासपाणी गावातील सर्व महिला, स पुरूषांनी आज २ ऑक्टोंबर गांधी प जयंतीदिनी गावातील चावडीवर सभा घेऊनदारूबंदीचा ठराव घेतला तसेच धारणी पोलिस ठाण्यात ठाणेदार अशोक जाधव यांना दारूबंदीबाबत कारवाईचे निवेदन दिले. आदिवासी नागरिकांचेनिवेदन मिळताच ठाणेदार अशोक जाधव यांनी तात्काळपथकासह बासपाणी गाव गाठून गावठी दारूच्या अड्डयांवर धाडी घातल्या. पोलिसयेत असल्याचे पाहून सर्व आरोपी फरार झाले. त्यामुळे पोलिसांनी दोन्ही गावठी दारू अड्डयांवरून तब्बल २ लाख १२ हजार रुपए किमतीची गावठी दारू व दारू बनविण्याचे साहित्य, भांडे जप्त केले. याबाबत धारणी पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपींविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलिस पुढील तपास करित आहेत.

# सोयाबीनच्या उत्पादनात घट, दुष्काळी स्थितीतही उत्पादन खर्च भरुन निघेना:

## निसर्गाच्या अवकृपेमुळे खरीप पिकांना मोठी झळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अकोला–** या वर्षीच्या खरीप हंगामात ओढवलेल्या अस्मानी तसेच सुलतानी संकटामुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात चिंता भेडसावत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. सध्याच्या परिस्थितीत खरीप हंगामातील महत्त्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या सोयाबीन पीक अंतिम टप्प्यात आहे तर हाती येत असलेल्या पिकांच्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारे उत्पन्न अल्प प्रमाणात असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. मुळात खरीप हंगामाच्या प्रारंभापासून आतापर्यंत निसर्गाच्या अवकृपेची झळ पिकांना मोठ्या प्रमाणात बसली आहे. परिणामी पिक परिस्थिती बिघडली त्यामध्ये प्रारंभी पावसाचा



लहरीपणा मध्यंतरीच्या कालावधीत अतिवृष्टी तर अखेरीस परतीचा जोरदार पाऊस यामुळे समाधानकारक उत्पादन हाती येण्याचे शेतकऱ्यांचे स्वप्न धुळीस मिळाले आहे तर हाती येत असलेल्या पिकाला बाजारात मिळणाऱ्या अल्प दरामुळे शेतकऱ्यांना गंभीर प्रश्न भेडसावत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. बाळापूर तालुक्यात एकुण महसूल १०३ गावे असून, तालुक्याची खरीप पिकांची नजर अंदाज पैसेवारी ४८ आल्याची माहिती प्रशासनाकडून समोर करण्यात आली आहे तर नजर अंदाज पैसेवारी ५० पेक्षा अधिक आली असता पीक परिस्थिती समाधानकारक मानली जाते. परंतु नजर अंदाज पैसेवारी ५० पेक्षा कमी आल्यास पीक परिस्थिती बिकट असल्याचे मानले जाते व दुष्काळ जाहीर करण्याचा मार्ग जवळपास मोकळा होत असल्याचे मानले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थिती बाबतीत शासन स्तरावरून कुठले निर्णय घेतले जातात. या कडे शेतकऱ्यांच्या नजरा लागल्या आहेत. खरीप हंगामात पेरणी करण्यात आलेल्या सोयाबीनसह आंतरपीक म्हणून घेतले जात असलेले तूर पीक तालुक्यात अल्प प्रमाणात लागवड करण्यात आलेले कपाशीसह इतरही पिकांची आजमितीला समाधानकारक परिस्थिती नसल्याने गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे

# रूप बदलणारी पिंगळाई गडावरची पिंगळा देवी: स्वयंभू शक्तिपीठ

## दर्शनासाठी देशभरातील भाविकाची गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नेरपिंगलाई –** पूर्वाभिमुख मोहक चेहरा, तेजस्वी डोळे, उंच कपाळ, त्यावर मधोमध चंद्रकोर व कुमकुम, वस्त्र परिधान केलेले पिंगळा देवीचे रूप पाहून भाविकांच्या चिंता दूर होतात. सकाळी बाल रूप, दुपारी तरुण रूप आणि सायंकाळी वृद्धरूप, असे देवीची तीन रूप दिसतात, असे भाविक सांगतात. नवरात्रीनिमित्त येथील मंदिरात देशाच्या कानाकोपऱ्यातून भाविक देवीच्या दर्शनाला येत आहेत. पिंगळादेवी ही स्वयंभू शक्तिपीठ म्हणून प्रसिद्ध आहे.

निसर्गाच्या सानिध्यात टेकडीवर पिंगळा देवीचे हे ऐतिहासिक मंदिर आहे. मंदिराचा व सभोवतालचा गाभारा हेमाडपंती बांधणीचा आहे. मंदिराच्या समोर दीपस्तंभ आहे. येथे शारदीय व चैत्र नवरात्र साजरा केला जातो. पौष महिन्यात चंडिका महायज्ञ उत्सव साजरा करतात. पिंगळादेवी ही माहूर येथील रेणुका देवीच्या रूपाप्रमाणेच भासणारी देवी आहे. पिंगळादेवी दिवसातून तीन वेळा रूप बदलते, अशी आख्यायिका आहे.

साडेतीन शक्तिपीठांपैकी अर्धशक्तीपीठ असलेली पिंगळाई गडावरील पिंगळा देवीच्या मंदिरात नवरात्रनिमित्त दहा दिवसाची पूजा सुरू असून, पिंगळा देवीचे दर्शन घेण्याकरिता भाविकांची गर्दी होत आहे. १२ ऑक्टोबरपर्यंत विश्वस्तांनी अनेक सामाजिक धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सायंकाळी होणाऱ्या



हरिपाठासह दिवसभर परिसरातील विविध भजनी मंडळांच्या भजनाचे स्वर येथे गुंजत असून ते भाविकांना मंत्रमुग्ध करत आहेत.

मंदिरालगतच कापूर तलाव सुंदर गडावर पिंगळाई देवीच्या मंदिरापासून काही अंतरावरच कापूर तलाव आहे. नवरात्रात अष्टमीच्या दिवशी कापूर तलावावर मोठ्या प्रमाणात कापूर जाळला जातो.

हा तलाव नागपूरकर भोसल्यांनी बांधल्याचे सांगितले जाते. या तलाव परिसरात एक आगळे–वेगळे वातावरण येणाऱ्या भाविकांना जाणवते.

# MSRTC एम्प्लॉईज को – ऑप.सोसायटी लि. नागपूर शुभारंभ सोहळा


## आपल्या हक्काची व विश्वासाची सोसायटी नागपूर सोसायटी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती –** घटस्थापनेच्या शुभ मुहूर्तावरसभासदांनच्या मागणी नुसार सभासदांना होणारा त्रास दूर करण्याचे उद्देशाने चडठढउ एम्प्लॉईज को – ऑप.सोसायटी लि नागपूर ची शाखा अमरावती मध्यवर्ती बसस्थानक जवळील महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेच्या मुख्य कार्यालयात स्थलांतरित करण्यात आली. त्या अनुषंगाने गुरुवारी घटस्थापनेच्या मंगल मुहूर्तावर शाखेच्या शुभारंभचा सोहळा मोठया जल्लोषात संपन्न झाला.

नागपूर सोसायटीचे असंख्य सभासद उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष श्री. बोकडे साहेब यांनी कामगार संघटनेचे संचालक मंडळ नागपूर सोसायटीचे माध्यमातून आपल्या सभासदांना उत्तम सेवा देण्याकरिता प्रामाणिकपणे काम करीत असून सभासदांनाच्या उज्वल भविष्यकारिता मध्ये सोसायटी नवं नवीन उपाययोजना तयार करून त्याची अंमलबजावणी करणार असून सोसायटीने सेवानिवृत्त कर्मचारी साठी मुदत ठेविवरील व्याजदर वाढवून ८% इतका केल्याचे आपल्या अध्यक्षीय भाषणातून सांगितलं. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोहित देशमुख यांनी केले. कामगार संघटनेच्या संचालक मंडळाच्या हातात ७० वर्ष मुबंई बँक होती त्या ठिकाणी सुद्धा संघटनेच्या संचालक मंडळाने



पारदर्शकपणे, प्रामाणिकपणे सभासदांसाठी काम केले. आणि आज नागपूर सोसायटीत सुद्धा संघटनेचे संचालक मंडळ पारदर्शकपने व प्रामाणिकपणे काम करीत आहे आणि पुढेही



करणार असल्याचा विश्वास सभासदांना दिला. जास्तीत जास्त लोकांनी नागपूर सोसायटीचे सभासद व्हावे असे आवाहन संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले.नवीन शाखेचे उदघाटन संस्थेचे अध्यक्ष तथा संचालकप्रशांत भाऊ बोकडे,उपाध्यक्ष तथा संचालक, श्याम भाऊ इसळ यांच्या शुभंहस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रज्ञाकर चंदनखेडे, प्रविणपुणेवार संचालक शशिकांत बंड असलम खान, मोहित देशमुख विभागीय सचिव, अमरावती ,अभिलाष उपस्थित होते.

# प्रो . राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्चच्या शिरपेचात मानाचा तुरा

## एडुस्किल कनेक्ट २०२४ मध्ये प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्चला ७ प्रतिष्ठित पुरस्कार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.४ अमरावती

प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च,बडनेरा यांना नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या एडुस्किल कनेक्ट २०२४ मध्ये ७ प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. या महाविद्यालयाने वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये १७०० हून अधिक वर्च्युअल सर्टिफिकेट पूर्ण केल्याबद्दल सहभाग प्रमाणपत्र देखील प्राप्त केले आहे. एडुस्किल ही –खउढए संलग्रित संस्था अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप व् कौशल्य विकास वर कार्य करते. एडुस्किलने मागील ३ वर्षांत ५ लाख इंटर्नशिप पूर्ण केल्याबद्दल वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद केली आहे, ज्यात प्रमुख योगदान दिल्याबद्दल महाविद्यालयाला प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.या कार्यक्रमात महाविद्यालयाला पश्चिम विभागातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे महाविद्यालय आणि एडुस्किल एक्सलन्स अवॉर्ड मिळाले. डीन ट्रेनिंग अँड प्लेसमेंट डॉ. निक्कू खालसा यांना डीन एक्सलन्स अवॉर्ड, प्रा. आनंद देशमुख यांना सीओई एक्सलन्स अवॉर्ड, प्रा. प्रणिता देशमुख आणि निकिता बंड यांना गूगल कंपनीच्या –ख–चङ विषयात ५०० हून अधिक विद्यार्थ्यांची इंटर्नशिप पूर्ण केल्याबद्दल एक्सलन्स एज्युकेटर अवॉर्ड मिळाले.

विदर्भ यूथ वेलफेयर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा च्या कौशल्य विकास कक्षाचे एडुस्किल कनेक्ट २०२४ मध्ये ७ प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल अभिनंदन केले आहे. डॉ. धांडे यांनी सांगितले की, महाविद्यालय नेहमीच विद्यार्थ्यांना उद्योगसिद्ध बनवण्यावर भर देत असून, त्यांना अत्याधुनिक तांत्रिक शिक्षण देण्याचा संस्थेचा उद्देश आहे. अशा प्रकारचे यश हे



विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचे द्योतक आहे.कौशल्य विकासासाठी महाविद्यालया द्वारे सतत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येते. या उद्योग आधारित उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना विविध कंपनी साठी तयार केले जाते आणि त्यांना चांगल्या प्लेसमेंट ऑफर मिळतात, असे मत प्राचार्य डॉ गजेन्द्र बमनोटे यांनी मांडले. प्राचार्य डॉ. जी. आर. बामनोटे यांनी या अद्वितीय यशासाठी प्रशिक्षण आणि प्लेसमेंट विभागांतर्गत कौशल्य विकास कक्ष चे कौतुक केले आहे. या बहुमानाचे श्रेय प्राचार्य डॉ गजेन्द्र बमनोटे यांनी विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीची प्रबंधक समिती, सर्व सम्बंधित शिक्षक तसेच विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमाला दिले आहे. महाविद्यालयाच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल संस्थाध्यक्ष डॉ नितीन धांडे, उपाध्यक्ष अ‍ॅड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा डॉ हेमंत देशमुख, सचिव युवराज सिंह चौधरी, कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे, प्रा डॉ सौ पुनम ताई चौधरी, पंकज देशमुख, विनय गोहाड, प्रा गजानन काळे तसेच प्राचार्य डॉ गजेन्द्र बमनोटे यांनी विद्यार्थी, प्राध्यापक तसेच महाविद्यालयाच्या सर्व घटकांचे अभिनंदन केले आहे.मेघे


इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च,बडनेरा यांना नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या एडुस्किल कनेक्ट २०२४ मध्ये ७ प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. या महाविद्यालयाने वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये १७०० हून अधिक वर्च्युअल सर्टिफिकेट पूर्ण केल्याबद्दल सहभाग प्रमाणपत्र देखील प्राप्त केले आहे. एडुस्किल ही –खउढए संलग्रित संस्था अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप व् कौशल्य विकास वर कार्य करते. एडुस्किलने मागील ३ वर्षांत ५ लाख इंटर्नशिप पूर्ण केल्याबद्दल वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद केली आहे, ज्यात प्रमुख योगदान दिल्याबद्दल महाविद्यालयाला प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.या कार्यक्रमात महाविद्यालयाला पश्चिम विभागातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे महाविद्यालय आणि एडुस्किल एक्सलन्स अवॉर्ड मिळाले. डीन ट्रेनिंग अँड प्लेसमेंट डॉ. निक्कू खालसा यांना डीन एक्सलन्स अवॉर्ड, प्रा. आनंद देशमुख यांना सीओई एक्सलन्स अवॉर्ड, प्रा. प्रणिता देशमुख आणि निकिता बंड यांना गूगल कंपनीच्या –ख–चङ विषयात ५०० हून अधिक विद्यार्थ्यांची इंटर्नशिप पूर्ण केल्याबद्दल एक्सलन्स एज्युकेटर अवॉर्ड मिळाले.

विदर्भ यूथ वेलफेयर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा च्या कौशल्य विकास कक्षाचे एडुस्किल कनेक्ट २०२४ मध्ये ७ प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल अभिनंदन केले आहे. डॉ. धांडे यांनी सांगितले की, महाविद्यालय नेहमीच विद्यार्थ्यांना उद्योगसिद्ध बनवण्यावर भर देत असून, त्यांना अत्याधुनिक तांत्रिक शिक्षण देण्याचा संस्थेचा उद्देश आहे. अशा प्रकारचे यश हे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचे द्योतक आहे.कौशल्य विकासासाठी महाविद्यालया द्वारे सतत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येते. या उद्योग आधारित उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना विविध कंपनी साठी तयार केले जाते आणि त्यांना चांगल्या प्लेसमेंट ऑफर मिळतात, असे मत प्राचार्य डॉ गजेन्द्र बमनोटे यांनी मांडले.

प्राचार्य डॉ. जी. आर. बामनोटे यांनी या अद्वितीय यशासाठी प्रशिक्षण आणि प्लेसमेंट विभागांतर्गत कौशल्य विकास कक्ष चे कौतुक केले आहे. या बहुमानाचे श्रेय प्राचार्य डॉ गजेन्द्र बमनोटे यांनी विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीची प्रबंधक समिती, सर्व सम्बंधित शिक्षक तसेच विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमाला दिले आहे. महाविद्यालयाच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल संस्थाध्यक्ष डॉ नितीन धांडे, उपाध्यक्ष अ‍ॅड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा डॉ हेमंत देशमुख, सचिव युवराज सिंह चौधरी, कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे, प्रा डॉ सौ पुनम ताई चौधरी, पंकज देशमुख, विनय गोहाड, प्रा गजानन काळे तसेच प्राचार्य डॉ गजेन्द्र बमनोटे यांनी विद्यार्थी, प्राध्यापक तसेच महाविद्यालयाच्या सर्व घटकांचे अभिनंदन केले आहे.

# नवरात्र उत्सवात स्वागत कमान नियमावलीला तिलांजली

### केवळ छोट्या व्यवसायिकांडूनच वसुली : राजकीय नेत्यांना सूट



विदर्भ प्रजासत्ताक
दि.४अमरावती

गुरुवारपासून नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाला आहे. यंदाही राजकमल चौक ते गांधी चौक दरम्यान स्वागत कमानी उभारणीसाठी महापालिका प्रशासनाकडून ११ हजार २४३ रुपयांची बोली निश्चित करण्यात आली. मात्र, ठरविलेली नियमावली गुंडाळली असून, पहिली स्वागत कमान महापालिका प्रशासनाची तर अन्य कमानी या राजकीय पक्षांना देण्यात आल्याची माहिती आहे.स्वागत कमानीला परवानगी देताना पारदर्शकता असावी, यासाठी महापालिका प्रशासनाने ही प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, गुरुवारी प्रत्यक्षात स्वागत कामानीला परवानगी घेताना 'नो ऑनलाइन', नो बोली' असाच काहीसा प्रकार राबविण्यात आल्याची माहिती आहे. राजकमल ते गांधी चौक या दरम्यान एकूण १३ स्वागत कमानी उभारण्यात येणार आहे. पहिल्या क्रमांकाची स्वागत कमान ही महानगरपालिका प्रशासनाची असणार आहे.

#### लघु व्यावसायिक प्लॉटमधून १४.५० लाखांची कमाई

राजकमल ते गांधी चौक यादरम्यान विविध लघु व्यवसायासाठी १४९ लहान प्लॉट टाकण्यात आले आहे. यात ८१ जणांना हर्रास केले असून, यात १४.५० लाखांची कमाई महापालिका प्रशासनाला झाल्याची माहिती आहे, तर ६८ प्लॉट आरक्षित ठेवण्यात आले आहेत. स्थागत कमानी परवानगी वा वाटप करताना कोणताही याद होऊ नये, याबाधत सामोपचाराने यात तोडगा निघावा, यासाठी पहिले गेट है महापालिका प्रशासनाचे असणार आहे. उर्वरित स्वागत कमानीचे वाटप सामोपचाराने करण्यात आले आहे.

**– प्रमोद इंगोले, उपअभियंता, राजापेठ झोन, महापालिका**

# ढोलताशांच्या गजरात माताराणीची प्रतिस्थापना

## बाजारपेठेत ग्राहकांची गर्दी : ज्योतिकलशांची स्थापना

विदर्भ प्रजासत्ताक
दि.४अमरावती

गुरुवारपासून नवरात्र उत्सवाला प्रारंभ झाला असून, बाजारपेठेतही उलाढाल वाढली आहे. अमरावती जिल्ह्यात ठिकठिकाणी सार्वजनिक दुर्गोत्सव मंडळातर्फे माता दुर्गा मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. याशिवाय देवीच्या मंदिरांमध्ये जवळपास नऊहजारपेक्षा अधिक ज्योतिकलशांची स्थापना करण्यात आली आहे. ढोलताशांच्या गजरात माताराणीची प्रतिष्ठापना करण्यात आली.



तिथीप्रमाणे यंदा नवरात्रोत्सव दहा दिवसांचे आले आहे. पूजेत देवीच्या श्रृंगाराला विशेष महत्त्व असते. देवीच्या श्रृंगाराच्या खरेदीसाठी महिलांची बाजारपेठेत गर्दी दिसून आली. नवरात्रोत्सवासाठी पूजा साहित्य आणि हवन सामग्रीचीही विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे. देवीचे मुखवटे, पोस्टर्स यासह दुर्गामातेच्या मूर्तीही मूर्तिकारांकडे उपलब्ध आहेत. या नऊदिवसांमध्ये अनेकजण उपवास करीत असल्याने फळे. ड्रायफ्रूट्स, रताळे यासह उपवासाच्या अन्य पदार्थांचीही बाजारामध्ये रेलचेल आहे. शारदीय नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी आंबा देवी व एकविरा देवी मंदिरात दर्शनासाठी भाविकांची रांग दिसून आली. मंदिरांना आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे.

आदिशक्तीचे मनोभावे स्वागत करण्यासाठी घटस्थापनेच्या पूर्वसंध्येला बाजारपेठेत नागरिकांची लगबग दिसली. घट, परडी, धान्य, ओटीचे साहित्य आदींनी दुकाने सजली होती. फुलांचे दर वाढले असले तरी झेंडू, शेवंती, गुलाब या फुलांनाही मोठी मागणी आहे. विजयादशमीपर्यंत नवरात्र साजरे केले जाणार आहे.

### कमळाचे फूल महागले

अतिवृष्टीने फुलशेतीला मोठा फटका बसला. फूल पिकांचे नुकसान झाले. त्यामुळे फुलांच्या किमती वाढल्या आहेत. झेंडू, गुलाब, निशिगंध, देवीच्या चरणी वाहण्याचे महत्त्व असलेले कमळाचे फूलही महागल्याचे समजते.

# राज्यपाल यांनी केले आर्या जाधव यांच्या कार्याचे कौतुक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.४अमरावती

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल महामहीम श्री. राधाकृष्णन साहेब यांचे सोबत कु. आर्या हेमंत जाधव हिची अमरावती येथील सर्किट हाऊस येथे सकाळी ९.०० वाजता भेट झाली. यावेळी हेमंत जाधव व परिवारातील सदस्य उपस्थित होते.भेटी दरम्यान सविस्तर चर्चा झाली. ज्यामध्ये आर्या जाधव हिचा परिचय एक कल्चरल आर्टिस्ट म्हणून करुन दिला.



त्याच बरोबर आर्या जाधव ही रॅप सिंगिंग मधे राष्ट्रीय पातळीवर परिचित असून तिच्या प्रत्येक गाण्यामध्ये आपली संस्कृती व युवा पिढीला मार्गदर्शन करणारे संदेश असतात.

तिचा प्रत्येक परफॉरमन्स मध्ये ती महाराष्ट्राची ओळख असणारी नऊवारी साडी घालून रंगमंचावर कला सादर करते. ह्या माध्यमातून आधुनिक कपड्यांपेक्षा पारंपारिक कपडे घालून तुम्ही सर्व प्रकारचे कार्य करू शकता असा संदेश ती तिच्या पेहराव्यातून देते. तिच्या प्रसिद्ध अल्बम मधील गाण 'वर्दीया' द्वारे समाजामध्ये मुलींवर होणाऱ्या कौटुंबिक अत्याचारा विरुद्ध जागृती करणे. त्याच प्रकारे 'निर्भया' गाण्यामध्ये महिलांवर होणाऱ्या शारीरिक अत्याचारा विरुद्ध धडा शिकवण्या बाबत संदेश दिला आहे. तिच्या 'आईना' या गाण्यामध्ये तिने सर्व महिलांना स्वतःला ओळखून स्वावलंबी होण्याचा संदेश दिला आहे.या सर्व बाबतची सविस्तर चर्चा मा. महामहीम राज्यपालां सोबत झाल्यावर त्यांनी आर्यला शाबाशकीची थाप दिली. तिचे कौतुक करुन सदर कार्य असेच अखंड चालू ठेवावे असे सुचित केले. तसेच त्यांनी पुढल्या दौऱ्याच्या वेळी भरपूर वेळ देण्याबाबत सुचित केले.आर्यनी सुद्धा राज्याचे प्रथम नागरिक मानले जाणारे महामाहीम राज्यपाल यांनी आमंत्रित करून त्यांचा अमूल्य वेळ दिल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.सदर भेटी दरम्यान विभागीय आयुक्त पांडे मॅडम, मा. जिल्हाधिकारी सौरभ कटियार, पोलीस आयुक्त मा. श्री. रेड्डी साहेब, व इतर मान्यवर उपस्थित होते.

# वकील संघाअंतर्गत स्व. ॲड. विजयराव देशपांडे क्रिकेट स्पर्धा संपन्न

विदर्भ प्रजासत्ताक
दि.४अमरावती

स्व. ॲड. विजयराव देशपांडे प्रतिष्ठान आणि अमरावती जिल्हा वकील संघाचे संयुक्त विद्यमाने खेलकट्टा मैदान, बडनेरा रोड, अमरावती येथे वकिलांच्या बॉक्स क्रिकेट स्पर्धा दिनांक २७, २८ आणि २९ सप्टेंबर २०२४ रोजी संपन्न झाले. या स्पर्धेचे हे दुसरे वर्ष होते. वकिली क्षेत्रामध्ये अमरावती परिसरात अतिशय वरचे स्थान मिळविणारे स्व. ॲड. विजयराव देशपांडे हे क्रीडा क्षेत्रात देखील आजीवन मार्गदर्शक, आयोजक तथा विविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी म्हणून कार्यरत होते व त्यांची स्मृती खेळाडूंना प्रेरणा दायक ठरावी या उद्देशाने त्यांचे पुत्र ॲड. प्रशांत देशपांडे अशा विविध स्पर्धांचे आयोजन करत असतात.




दिनांक २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी माननीय सुधाकरराव यार्लागड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे हस्ते आणि ॲड. विश्वाश काळे, अध्यक्ष अमरावती जिल्हा वकील संघ यांचे अध्यक्षतेखाली या स्पर्धेचे थाटामाटात उद्घाटन संपन्न झाले. या उद्घाटन समारोपाला जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. अनिल लद्दड, श्री. प्रभकर मोडक तसेच जिल्हा वकील संघाचे सचिव ॲड. चंद्रसेन गुळसुंदरे, जेष्ठ अधिवक्ता ॲड. वासुदेव नवलानी, ॲड. रामपाल कलंत्री, मुख्य जिल्हा सरकारी वकील परीक्षित गणोरकर आणि आयोजन समितीचे प्रमुख ॲड. प्रशांत देशपांडे मंचावर उपस्थित होते. या स्पर्धेत एकंदर २० चमू सहभागी झाले होते आणि त्यात २०० वकील क्रिकेट खेळाडूंनी प्रत्यक्ष भाग घेतला. अतिशय रंगतदार आणि अटीतटीच्या सामन्यांच्या क्रीडा प्रेमींनी देखील मनमुराद आनंद लुटला. संपूर्ण स्पर्धेदरम्यान क्रीडा प्रेमींची लक्षणीय उपस्थिती होती. या स्पर्धे दरम्यान एकंदर ४७ सामने राउंड रॉबिन आणि नॉक आउट पद्धतीने खेळविल्या गेले.

रविवार दिनांक २९ सप्टेंबर रोजी रात्री उशिरा सामन्यांचा निकाल हाती आला. अंतिम सामना चक दे हीटर्स आणि ट्रिपल ए या संघांच्या दरम्यान खेळण्यात आला आणि अतिशय चुरशीच्या झालेल्या या सामन्यात चक दे हिटर्स संघाने विजेते पद पटकाविले. स्पर्धेतील विजेत्या संघाला रुपये ११.१११/– आणि चषक तसेच उपविजेत्या संघाला रुपये ७,७७७/– आणि चषक प्रदान करण्यात आले. या शिवाय मॅन ऑफ दि सिरीज आणि उत्कृष्ट फलंदाज ही दोन्ही पारितोषिके ॲड. साकल्य काळे, उत्कृष्ट गोलंदाज ॲड. आदित्य कावडे, आणि उत्कृष्ट क्षेत्र रक्षक ॲड. आशु मिश्रा यांना देण्यात आले. बक्षीस वितरण समारंभाला ॲड. विवेक काळे, ॲड. सुनील देशमुख, ॲड. दिलीप तिवारी, ॲड. झिया खान, ॲड. प्रवीण ठाकरे आणि आयोजक ॲड. प्रशांत देशपांडे मंचावर उपस्थित होते.

# ज्वालामुखी जगदंबा एमआयडीसी प्रकल्पग्रस्त मजूर संस्थेवर कारवाई न झाल्यास जिल्ह्यातील मजूर संस्था बसणार उपोषणाला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

मजुर सहकारी संस्थेला काम येताना आर्थिक प्रमाणपत्र, ना हरकत प्रमाणपत्र असे जिल्हा मजूर सहकारी संस्था सस्थाने घेणे बंधनकारक आहे असा शासनाचा अध्यादेश असताना शेलुगुंड येथील ज्वालामुखी जगदंबा व वाघोली अमरावती संस्थाले एमआयडीसी प्रकल्पग्रस्त मजूर संस्था शासन व प्रशासनाला वारंवार खोटे पत्र देऊन दिशाभूल करीत असल्याने जिल्ह्यातील मंजूरी सस्थाना कामे मिळणे अवघड होत आहे या दोन्ही मजूर संस्थेवर शासनाने कारवाई न केल्यास आता जिल्ह्यातील सर्व माल सहकारी संस्था उपोषणाला बसणार असल्याचा इशारा पत्रकार परिषदेत देण्यात आला आहे



अमरावती जिल्ह्यात असलेल्या मजूर सहकारी संस्थांना पारदर्शकपणे व्यवस्थित विविध विभागाची कामे मिळावी म्हणून अमरावती जिल्हा मजुर सहकारी संस्थाचा संघ कार्यान्वित आहे. मात्र या मजूर संघाच्या विरोधात शेलुगुंड येथील ज्वालामुखी जगदंबा मजूर संस्थेचे अध्यक्ष नितीन जोशी तसेच वाघोली अमरावती येथील एम.आय.डी.सी. प्रकल्पग्रस्त चे अध्यक्ष दीपक खडसे वारंवार मजूर संघाची तसेच जिल्हा उप निबंधक यांची तक्रार करून वेठीस धरून ब्लॅकमेलिंग करण्याचे प्रकार करीत आहे.

जिल्ह्यातील कोणत्याही मजूर संस्थेला आर्थिक प्रमाणपत्र पाहिजे असेल तर जील्हा मजूर संघाच्या वतीने सदर प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असल्याचा ३० जून २०२० ग्रामविकास विभागाचा निर्णय आहे तसेच ई निविदा प्रक्रियेत विविध विभागामार्फत कामे घेताना जिल्हा मजुर सहकारी संघाचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे तसा सहकार व पणन विभागाचा १४ जुलै २०२३ शासकीय अध्यादेश आहे या या दोन्ही शासन निर्णयाची जिल्हा मजूर सहकारी संस्थाचा संघ व्यवस्थितपणे अंमलबजावणी करीत असून जिल्ह्यातील सर्व मजूर सहकारी संस्थांना कामे नियानीत पने मिळत आहे.

ज्वालामुखी जगदंबा व एमआयडीसी प्रकल्पग्रस्त मजूर संस्थेचा ब्लॅकमेलिंग चा प्रकार ज्या मजूर संस्थेला काम पाहिजे त्यांना जिल्हा उपनिबंधक यांच्याकडे अर्ज करावा लागतो त्या नमितीमध्ये सदर कामे मिळाले जातात यात मजूर संघाचा कुठेही हस्तक्षेप राहत नसताना केवळ आपल्यालाच कामे मिळाली पाहिजे म्हणून दोन्ही मजूर संस्थेचे अध्यक्ष नितीन जोशी व दीपक खडसे वारंवार उपोषणाला बसून ब्लॅकमेलिंग दबावतंत्र निर्माण करण्याचा प्रकार करीत आहे वास्तविक पाहता सदर दोन्ही संस्थे जिल्हा परिषद बांधकाम विभागा मध्ये कोट्यावधीची कामे मागील दोन ते तीन वर्षात झालेली असल्याच माहिती यावेळी जिल्हा मजूर सहकारी संस्थांचे संघाचे संचालक अशोकराव दुधंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जिल्ह्यातील मजूर संस्था बसणार उपोषणाला अमरावती जिल्ह्यात असलेल्या मजूर सहकारी संस्थाचा व जिल्हा मजूर संघाचा कारभार व्यवस्थित सुरू असताना केवळ दोन्ही मजूर संस्थेचे अध्यक्ष जिल्हा मजूर संस्थाचा संघ, जिल्हा उपनिबंधक यांची बदनामी करीत आहे एकीकडे शेलूगुड येथील ज्वालामुखी, जगदंबा मजूर संस्थेचे अध्यक्ष नितीन जोशी यांनी आपल्या संस्थेत जे सभासद आहे ते त्या सभासदांना माहीत नसल्याचे उघड झाले आहे त्यांच्या खोट्या साक्षरी मारण्याचा प्रकारे पुढे आला आहे वाघोली येथील एमआयडीसी प्रकल्पग्रस मजूर संस्थेचे अध्यक्ष दीपक खडसे यांनी मालखेड येथे मत्स्य विभागाची असलेल्या जागेवर अतिक्रमण करून सदर जागा बडकवण्याचा प्रयत्न केला होता ते महसूल उपविभाग चांदुर रेल्वे यांनी काही दिवसापूर्वीच उघड केले आहे विशेषता जिल्हा मजूरसरकारी संस्था संघाच्या अध्यक्षांच्याही खोट्या सह्या मारून खोटे आर्थिक पात्रता प्रमाणपत्र कामे मिळण्यासाठी तयार केले होते जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था, जिल्हा मजूर सहकारी संस्थांचा संघ व जिल्हा उप निबंधक यांना वेठीस धरणाऱ्या ज्वालामुखी अणदबा व एमआयडीसी प्रकल्पग्रस्त या दोन्ही मजूर सहकारी संस्थावर त्वरित कारवाई करावी अन्यथा जिल्ह्यातील मजूर सहकारी सस्थेचे पदाधिकारी उपोषणाला बसणार असल्याचा इशारा जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्थांनी आजच्या पत्रकार परिषदेत दिला या पत्रकार परिषदेला जिल्हा मजूर सहकारी संस्था संघाचे अध्यक्ष मो तनवीर सादिक काजी, उपाध्यक्ष साहेबराव माकोडे, संचालक अशोक दुधडे, माधव शेंडे, नंदकिशोर मोहोड, अझर खान हबीब खान, स्वप्नील भुयार,, व मजूर संस्थांचे प्रवीण बमनोटे, आनंदवर्धन आडीकने, सुशील शिंदे, सतीश काटोलकर, प्रमोद गिरनाळे, जगन राउत, मुकेश वाहुरबाघ, प्रकाश गावंडे, शंकरराव काळे, दीपक काळे, अमित केंडे, सतीश मोहोड तसेच जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था चे अध्यक्ष, सचिव उपस्थित होते.

# ग्रामपंचायतीमध्ये सुपरफास्ट इंटरनेट तुमच्या गावात आले का?

## डिजिटलायझेशनवर भर : केंद्र सरकारच्या योजनेची अंमलबजावणी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

केंद्र व राज्य सरकारच्यावतीने शासकीय कार्यालयातील कामांना गती येण्यासाठी गेल्या चार-पाच वर्षांपासून डिजिटल धोरण अवलंबिले जात आहे. बहुतांश कामे ऑनलाइन करण्यात आली आहेत. दरम्यान, गावपातळीवरही ऑनलाइन कामे पार पडावी, यासाठी केंद्र सरकारच्या योजनेतून ग्रामपंचायतींना सुपर फास्ट इंटरनेट देण्याची योजना अंमलात आणण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून प्रशासनाच्या पुढाकाराने बीएसएनएल व इतर कंत्राटदाराच्या साहाय्याने ग्रामपंचायतीमध्ये सुपरफास्ट इंटरनेट बसविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यातील ग्रामपंचायतींमधील गावांत सुपरफास्ट इंटरनेट सुविधा आता उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याचे काम जिल्हा प्रशासनाच्यावतीने खासगी एजन्सीमार्फत तालुक्यात सुरू आहे. ग्रामीण भागात पुरेसे इंटरनेट मिळत नसल्याने ऑनलाईन कामासाठी नागरिकांना पैसे आणि वेळ खर्च करून तालुक्याच्या ठिकाणी यावे लागत होते.

प्राथमिक आरोग्य केंद्र, शाळा, पोलिस चौकी यांनाही इंटरनेट मिळणारया माध्यमातून प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा परिषद शाळा, पोलिस मदत केंद्र, तलाठी कार्यालय व वनपरिक्षेत्र आदी कार्यालयातही इंटरनेट सेवा मिळणार आहे.

# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने महानुभाव पंथाने व्यक्त केला आनंद

## रिद्धपुरमध्ये साकार होतंय भारतातील पहिलं मराठी भाषेच विद्यापीठ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४रिद्धपुर**

मराठी भाषेतील पहिल्या 'लीळाचरित्र' या ग्रंथाची रचना चक्रधर स्वामीनि अमरावती जिल्ह्यातील रिद्धपुरात केली.मराठी भाषेची पंढरी असलेल्या रिद्धपूर येथे मराठी भाषेचे भारतातील पाहिले विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे.तर केंद्र सरकारने काल मराठी भाषेलाअभीजात भाषेचा दर्जा दिला त्यामुळे महानुभाव पंथाच्या लढ्याला खऱ्या अर्थाने यश मिळाले आहे.कारण महानुभाव पंथांच्या महानुभावानी चक्रधर स्वामी यांनी लिहलेल्या मराठी भाषेच्या ग्रंथाचे जतन केले आहे. चक्रधर स्वामींनी लिहलेल्या ६ हजार ५०० मराठी भाषेच्या ग्रंथातील ६०० हस्तलिखित ग्रंथ अमरावती मध्ये आहे, तर जागतिक पहिलं मराठी भाषेचं विद्यापीठ रिद्धपुर मध्ये होत आहे. त्यासाठी २८ विद्यार्थ्यांनी प्रवेश केला आहे.तर मराठी भाषाला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने महानुभाव पंथाचे वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहे.





आजचा दिवस माय मराठीच्या इतिहासातील एक ऐतिहासिक दिवस ! मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचा निर्णय निश्चितच स्वागताहार्य आणि आनंदायी आहे. या निर्णयाने गेल्या अनेक वर्षापासूनची मागणी मार्गी लागली असून, माय बोली मराठीला खऱ्या अर्थाने न्याय मिळाला आहे.

**कारंजेकर महाराज**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याची बातमी प्रत्येक मराठी व्यक्तीसाठी आनंद व अभिमानाची बाब आहे. प्रदीर्घ काळ आणि सातत्याने केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची दखल घेत केंद्र शासनाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याने खऱ्या अर्थाने अंबाबाईचा जागर झाला आहे. या अभिजात भाषेला अधिक समृद्ध करणे. फुलवणे ही सर्वांची जवाबदारी आहे.

**प्रा.शुभांगी जोशी**

मराठी साहित्याला ११ व १२ व्या शतकापासूनची परंपरा आहे. अनेक दर्जेदार साहित्य सुद्धा प्रकाशित झाले आहे. संत ज्ञानेश्वरांनी अभिजात साहित्य निर्माण केले होते. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी अनेक साहित्यिकांनी ही मागणी लावून धरली होती. अखेर केंद्र सरकारने उशिरा का होईना मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला तो स्वागताहार्य आहे.

**प्रा.संजय शेंडे**

# ठसे घेतात किती किलोसाठी; प्रत्यक्षात रेशन मिळते किती?

## पावती तपासा : अंत्योदयला ३५ तर प्राधान्यला प्रति व्यक्ती ५ किलोची तरतुद

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**





शासनाकडून गरीब व्यक्तींना प्रत्येक महिन्याला मोफत रेशन उपलब्ध करून दिले जाते. मात्र शासनाकडून जेवढे रेशन मंजूर होते तेवढे रेशन दुकानदार देतात काय? हा प्रश्न आहे.

दर महिन्याला रेशन मिळाले तर अडचण जात नाही. आपल्याला किती रेशन मिळते, याची माहिती लाभार्थ्यांना असते. त्यामुळे तेवढे धान्य ते दुकानदाराकडून मागतातच. मात्र काहीवेळा धान्य उपलब्ध होत नाही. विशेष करून साखरेच्या बाबतीत गंभीर समस्या निर्माण झाली आहे. अंत्योदय लाभार्थ्यांना साखर दिली जाते. मात्र साखर नियमित मिळत नाही. एकाचवेळी दोन ते तीन महिन्याची साखर दिली जाते. दुकानात साखर उपलब्ध झाल्याची माहिती लाभार्थ्यांना मिळत नाही. परिणामी काही दुकानदार साखर देत नाही, दिले तरी कमी देतात.धान्यासाठी हाताचा ठसा दिल्यानंतर पावती निघते. या पावतीवर संबंधित कार्डधारकाला किती धान्य देय आहे, याचीनोंद असते. त्यामुळे धान्य घेण्याच्या पूर्वी या पावतीवर एक नजर टाकणे प्रत्येक लाभार्थ्यांने आवश्यक आहे.

**पिवळे :** प्रत्येक अंत्योदय कार्डासाठी ३५ किलो रेशन उपलब्ध करून दिली जाते, हे विशेष.

**केशरी :** याला प्राधान्य कुटुंबाचे कार्ड म्हणतात. प्रति व्यक्ती पाच किलो प्रमाणे धान्य दिले जाते.

**पांढरे :** या रेशनकार्डवर धान्य दिले जात नाही. त्यामुळे सदर कार्ड फार कमी नागरिक काढत असतात.

**साखरेच्या बाबतीत गडबड**

अंत्योदय लाभार्थ्यांना प्रति कार्ड, प्रति महिना एक किलो साखर दिली जाते. मात्र ही साखर नियमितपणे पुरवली जात नाही. दोन ते तीन महिन्यांची साखर एकदाच दिली जाते. साखर नेमक्या किती महिन्याची मिळायची शिल्लक आहे, याची माहिती लाभार्थ्यांना राहत नाही, याचा गैरफायदा दुकानदार घेतात. तीन महिन्यांची साखर उपलब्ध झाल्यास दोनच महिन्यांची साखर देत असल्याचे प्रकार जिल्ह्यात घडत आहेत.

# १५ ते २२ ऑक्टोंबर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ५६ व्या पुण्यतिथी महोत्सव : २१ ऑक्टोंबर ला मौन श्रद्धांजली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४गुरुकुंज मोझरी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५६ व्या पुण्यतिथी महोत्सव निमित्य दि.४ ऑक्टोबर २०२४ रोजी गुरुकुंज मोझरी येथे पत्रकार परिषद पार पडली.यावेळी तिवसा तालुक्यातील मराठी पत्रकार संघटना व अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेतील प्रतिनिधी उपस्थित होते.यावेळी अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामंडळा चे सर्वाधिकारी लक्ष्मणजी गमे,जनार्धनजी बोथे,डॉ.राजारामजी बोथे(प्रचार विभाग प्रमुख) यांनी पुण्यतिथी महोत्सवा चे नियोजना बद्दल सविस्तर माहिती देण्यात आली.संपूर्ण विश्वाला मानवतेचा संदेश देणारे क्रांतीदर्शी युगपुरुष तथा स्वातंत्र्य सैनिक राष्ट्रसंत



तुकडोजी महाराज यांचा ५६ वा पुण्यतिथी महोत्सव दि.१५ ते दि.२२ ऑक्टोंबर २०२४ पर्यंत श्री क्षेत्र गुरुकुंज आश्रम येथे आयोजित केला आहे.अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामंडळ,श्री क्षेत्र गुरुकुंज आश्रम यांनी या महोत्सवा चे नियोजन केले असून सात दिवशीय या महोत्सवात दररोज सामुदायिक ध्यान,सामुदायिक प्रार्थना व त्यावरील चिंतन, ग्रामसफाई,प्रवचन,कीर्तन संमेलन(गुरुकुंज वारी) भजन संध्या,खंजेरी भजन,योगासन शिबीर, वकृत्व स्पर्धा,ग्रामगिताचार्य पदवीदान समारंभ,कार्यकर्ता संमेलन,महीला मेळावा,अभंग गायन तसेच सामुदायिक प्रार्थना विश्वशांतीचा महामंत्र या विषयावरील परिसवांदात विदेशी भाविक सहभागी होणार आहे.यामध्ये सर्वात भावस्पर्शी कार्यक्रम मौन श्रद्धांजली चा असून दि.२१ ऑक्टोंबर २०२४ रोजी होत आहे.

# गोपाल नगर अंडरपासच्या कामाची आमदार रवी राणा यांनी मनपा व रेल्वे अधिकारी यांच्या सोबत केली पाहणी

## ६० ते ७० टक्के काम पूर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती**



माजी खासदार सौ नवनीत रवी राणा व आमदार रवी राणा यांच्या अथक प्रयत्नाने मंजूर गोपाल नगर अंडरपास च्या कामाची आमदार रवी राणा यांनी मनपा व रेल्वे अधिकारी यांच्या सोबत पाहणी केली जवळपास ६० ते ७० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम तातडीने पूर्ण करून हा भुयारी मार्ग नागरिकांच्या सोयीसाठी तातडीने पूर्ण करा-आमदार रवी राणा यांचे मनपा व रेल्वे विभागाला निर्देश दिलेत.

शहरातील गोपाल नगर,एम आय डी सी परिसर व जुना राष्ट्रीय महामार्ग क्र ६ यांना जोडणारा व रेल्वे क्रॉसिंग व फाटकाचा अडथळा न येता सुरळीत वाहतूक सुरू करून नागरिकांना वाहतुकीची सुविधा प्रदान करण्यासाठी माजी खासदार सौ नवनीत रवी राणा व आमदार रवी राणा यांनी अथक परिश्रम करून ८७ करोड चा गोपाल नगर अंडरपास मंजूर करून आणला आज आमदार रवि राणा यांनी या भुयारी मार्गाची पाहणी केली,या वेळी मनपा आयुक्त सचिन कलत्रे,व इतर रेल्वे अधिकारी यांना सोबत घेऊन पाहणी केली

अँप्रोच रोड तयार करतांना नागरिकांच्या मालमत्तेला धोका होणार नाही,रस्ता रुंदीकरण करून मोठी वाहने जातील अशी सुविधा करण्यात यावी,तसेच ड्रेनेज नाल्या बांधतांना रस्त्यांच्या लेव्हल ने बांधण्यात याव्या तसेच उर्वरित काम त्वरित करून हा भुयारी मार्ग तातडीने खुला करण्यात यावा असे निर्देश आमदार रवि राणा यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी आमदार रवी राणा यांच्यासमवेत माजी नगरसेवक सुनील काळे,सुमती ढोके, सचिन भेंडे, सचिन बोंडे,इंद्रजीत नागदिवे जयंत जाधव डॉक्टर सोनी देशपांडे साहेब तटे साहेब जीवन बनारसे इंगळे साहेब मनोज जोशी दिनेश घरडे गजू सोनवणे गणेश घरडे दिनेश जाधव मंगेश जाधव आदी उपस्थित होते.

# राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचा विद्यापीठाच्यावतीने कुलगुरूंनी केला सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलपती श्री सी.पी. राधाकृष्णन हे अमरावती दौ-यावर आले असतांना स्थानिक विश्रामगृह येथे त्यांची कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी भेट घेतली. यावेळी विद्यापीठाच्या प्रशासकीय व शैक्षणिक प्रगतीसंदर्भात मा. राज्यपालांशी सविस्तरपणे चर्चा करण्यात आली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यापीठाच्यावतीने राज्यपाल श्री सी.पी. राधाकृष्णन यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. यावेळी विभागीय आयुक्त श्रीमती निधी पांडेय, जिल्हाधिकारी श्री सौरभ कटियार यांचेसह उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते.